बी.एम. प्रतिष्ठान
बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | रविवार,दि.२२सप्टेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक५१वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३


### महिलांचे व्हिडिओ रेकॉर्ड करायचा

दिल्ली: गेल्या काही दिवसांपासून महिला अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. कामाच्या ठिकाणी, शाळेत, महाविद्यालयात महिलांवरील अत्याचारात वाढ झालीय. महिलांसाठी कोणतंच ठिकाण सुरक्षित नसल्याने महिलांकडून संताप व्यक्त केला जातोय. दरम्यान, बंगळुरूतूनही आता असाच एक प्रकार समोर आला आहे. कॉलेजच्या बाथरूममधून महिलांचे रेकॉर्डिंग करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी २१ वर्षीय अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्याला अटक करण्यात आली आहे. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्याने त्याच्या मोबाईलमध्ये जवळपास आठ व्हिडिओ रेकॉर्ड केले होते. त्याच्याकडून सातत्याने असे व्हिडिओ रेकॉर्ड केले गेले असतील, असा दावाही काही विद्यार्थ्यांनी केला आहे.

# आमचे आणि धनगरांचे वैर नाही

## आरोप: मनोज जरांगे म्हणाले छगन राज्यात दंगली घडविणार





जालना/पुण्यभूमी प्रतिनिधी

मनोज जरांगे यांनी गेल्या पाच दिवसांपासून अंतरवली सराटी येथे पुन्हा एकदा उपोषणाला सुरूवात केली आहे. जरांगे यांच्या समर्थकांना अंतरवलीकडे उपोषणस्थळी जात असताना वडीगोद्री येथे अडवण्यात आलं. त्यावेळी मराठा समन्वयक आण ओबीसी आंदोलकांमध्ये तणाव निर्माण झाला होता. जरांगेंनी थेट मंत्र्यांना फोन फिरवल्याचं समजताच तिथले बॅरिकेटिंग हटवण्यात आलं. या प्रकरणावर मनोज जरांगे यांनी आपली प्रतिक्रिया दिली. छगन भुजबळ यांचा मोठा डाव असून त्यांना दंगली घडवायच्या असल्याचा गंभीर आरोप जरांगेंनी केला.

आमचे आणि धनगरांचे वैर नाही आणि ते पिढ्यान पार नाही. लक्ष्मण हाके कोण आलाय भांडण विकत घेणारा, स्वतःला काय जहागीरदार समजतो का? छगन भुजबळ हरामखोर म्हातारपणी गु चिवडायला लागला आहे. म्हातारपनी का डाग लावून घेत आहे. तो हरामखोर भुजबळ इकडे दंगली भडकवून देत आहे. फडणवीसचं एकूण कशाला दंगली लावतो रे. इथे काही झाले तर याला जबाबदार फक्त छगन भुजबळ आणि फडवणीस राहतील, अशा एकेरी शब्दात बोलत मनोज जरांगे यांनी थेट छगन भुजबळ आणि देवेंद्र फडणवीसांवर निशाणा साधला.आम्ही बसलो की हे आंदोलनाला बसतात, आम्ही नसल्यावर त्यांनी आंदोलन करावे. यांच्या ढुंगणाला काय साप चावतो का? आम्ही आलो की हे कसे काय येऊन बसतात. कशामुळे मराठ्यांचे आणि धनगरांची भांडणे लावायचे आहे. धनगर आरक्षणाला आमच्यामुळे धक्का लागत नाही, त्यांचा वेगळा प्रवर्ग आहे. आम्ही ऐकून घेतो म्हणजे तुम्ही काय मस्ती लावली का? हे गरीब धनगरांना हे सर्व माहित असल्याचं जरांगे म्हणाले.मराठा आरक्षण संदर्भात सरकारला आणि देवेंद्र फडणवीस यांना निर्णय घ्यावा लागणार आहे, हे भांडण लावण्याचे कुचल धंदे बंद करा. निर्णय घ्यायचं शिका. आम्हाला राजकारणाचं काही देणे घेणे नाही, आमच्या मागण्यांची अंमलबजावणी करा. छगन भुजबळ राज्यात दंगली घडवणार आहे, जर माझ्या माणसाला त्रास झाला तर जालन्याच्या एसपीला सांगतो केसेस नोंदवून घ्या. वडीगोद्रीमधून येणाऱ्या जाणाऱ्या आमच्या माणसाला धोका आहे. जालन्याच्या एसपीला सांगतो माझ्या माणसाला तिथे धोका आहे, आणि कुणी माझ्या मराठ्याला त्रास झाला तर त्यांच्यावर ३०७ चे गुन्हे दाखल करा, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

# आतिशी मार्लेना दिल्लीच्या मुख्यमंत्री

## अभिनंदनिय:दिल्लीच्या सर्वात तरुण मुख्यमंत्री म्हणून चर्चेत!

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

आतिशी मार्लेना यांनी आज दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे. आम आदमी पक्षाचे प्रमुख नेते आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी १७ सप्टेंबरला त्यांच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर आतिशी यांची एकमताने निवड मुख्यमंत्री म्हणून करण्यात आली. २१ सप्टेंबर शनिवार या दिवशी आतिशी यांना उपराज्यपालांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ दिली. आतिशी या आपच्या आमदार आहेत. अरविंद केजरीवाल आणि मनिष सिसोदिया यांच्या निकटवर्तीय मानल्या जातात.दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून



आतिशी यांनी शपथ घेतली. त्यांच्यासह पाच आमदारांनाही मंत्रिपदाची शपथ देण्यात आली. उपराज्यपालांच्या पान २ वर...

### आतिशी कोण आहेत?

आतिशी मार्लेना या दिल्लीच्या कालकाजी मतदारसंघातून आमदार आहेत.अरविंद केजरीवाल सरकारमध्ये त्यांच्याकडे सर्वाधिक खात्यांची जबाबदारी होती. माजी उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांच्या सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिलं आहे. आतिशी दिल्ली सरकारमधील उच्चशिक्षित मंत्र्यांपैकी एक होत्या, आता त्या मुख्यमंत्री झाल्या आहेत.

### दोन महिला मुख्यमंत्री

आतिशी या दिल्लीच्या तिसऱ्या महिला मुख्यमंत्री आहेत. त्याआधी भाजपाच्या सुषमा स्वराज आणि काँग्रेसच्या शीला दीक्षित यांनी दिल्लीचं मुख्यमंत्रिपद सांभाळलं आहे. १९९८ मध्ये सुषमा स्वराज या ५२ दिवसांसाठी मुख्यमंत्री झाल्या होत्या. तर १९९८ मध्ये शीला दीक्षित या १५ वर्षे २५ दिवसांसाठी मुख्यमंत्री होत्या. दीर्घ काळ मुख्यमंत्री राहण्याचा रेकॉर्ड हा शीला दीक्षित यांच्या नावे आहेत. यानंतर आता आपच्या नेत्या आतिशी दिल्लीच्या मुख्यमंत्री झाल्या आहेत. आतिशी यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातून इतिहासाची मास्टर्स पदवी घेतली आहे.

# ...अन्यथा आम्ही आत्मदन करु

## आंदोलन: आजची कॅबिनेट रद्द, शिक्षकांची घोर निराशा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या ५० दिवसांपासून शिक्षक उपसंचालक कार्यालय कोल्हापूर येथे राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील हजारो शिक्षक वाढीव टप्प्याचा जी आर आणि आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. विनाअनुदानित, अंशतः अनुदानित शाळांमधील हे शिक्षक गेल्या ५१ दिवसांपासून आपल्या हक्कांसाठी आंदोलन करत आहेत. शिक्षणमंत्र्यांकडून वाढीव टप्प्याचा जी आर काढण्यात येईल, १८ तारखेला आपली कॅबिनेट आहे त्यावेळी निर्णय घेतला जाईल असे काही दिवसांपूर्वी सांगण्यात आले होते, परंतु ती झालीच नाही. काल एकोणीस तारखेला कॅबिनेट होईल अशी आशा असतानाच एकोणीस तारखेची कॅबिनेट ही रद्द झाल्याने सर्व शिक्षकांची घोर निराशा झाली असून आता सोमवार दि. २३ रोजी कॅबिनेट असल्याचे समजते.




येत्या सोमवारी कॅबिनेट बैठक असल्याचे समजते. गेली दोन महिने शिक्षकांनी मोठा संघर्ष केलेला आहे. याचे शासनाने भान राखून कोणतीही गुंतागुंत किंवा धोका न करता शिक्षकांच्या मागण्याप्रमाणे मंगळवार दिनांक २४ पर्यंत जीआर काढावा. अन्यथा शिक्षण उपसंचालक कार्यालय कोल्हापूर येथे सामूहिक आत्मदहन करण्यात येईल, आणि याची सर्व जबाबदारी सरकारवर राहील.

–खंडेराव जगदाळे,उपाध्यक्ष, विनाअनुदानित कृती समिती


अनेक दिवस कॅबिनेट बाबत चालढकल आणि या आंदोलनाकडे सरकारने फारसे लक्ष न दिल्याने हे शिक्षक संतप्त झाले आहेत. सरकारला आता या पान २ वर...

# श्रद्धा वालकर हत्याकांडांची पुनरावृत्ती!

## खळबळ: फ्रीजमध्ये आढळले महिलेच्या शरीराचे २० तुकडे

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्लीत घडलेल्या श्रद्धा वालकर हत्याकांडासारखीच घटना बंगळुरूमध्ये घडली आहे. एका महिलेची निर्घृण हत्या करून तिच्या मृतदेहाचे २० तुकडे फ्रिजमध्ये ठेवण्यात आले होते. बंगळुरूच्या व्यालिकवल परिसरात शनिवारी (दि. २१ सप्टेंबर) ही घटना उघडकीस आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ वर्षीय महालक्ष्मी नावाची तरुणीचा खून झाला आहे. तिच्या पतीचे नाव हेमंत दास आहे. पण गेल्या काही दिवसांपासून ती एकटीच राहत होती.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर खून १५ दिवसांपूर्वीच झाला असून महालक्ष्मीच्या शरीराचे तुकडे करून १६५ लीटरच्या फ्रिजमध्ये ठेवण्यात आले. शेजाऱ्यांना दुर्गंधी येऊ लागल्यानंतर त्यांनी याची माहिती महालक्ष्मीच्या नातेवाईकांना दिली. त्यांनी येऊन पाहिल्यानंतर सदर प्रकार उजेडात आला. व्यालिकवल पोलीस आता या घटनेचा तपास करत आहेत.अतिरिक्त पोलीस आयुक्त एन. सतीश कुमार यांनी सांगितले की, आम्ही न्यायवैद्यक पथक आणि श्वान पथकाला पाचारण केले आहे. या गुन्ह्याचा सखोल तपास सुरू करण्यात आला आहे. या घृणास्पद गुन्ह्यामागे नेमके काय कारण होते? हे अद्याप कळू शकलेले नाही. आमचा पुढील तपास सुरू आहे. पान २ वर...

# बिल्डरसारख्या अवलादींना हेच हवं असतं

## परखड: राज ठाकरेंनी सांगितलं टाऊन प्लानिंगचं महत्त्व!

बीड/पुण्यभूमीप्रतिनिधी

वरळी विधानसभा मतदारसंघात म्हणजे आदित्य ठाकरे यांच्या मतदारसंघातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी झंझावाती भाषण केलं. टाऊन प्लानिंगपासून पुतळ्याच्या राजकरणापर्यंत राज ठाकरेंनी सडेतोड भाषण केलं. तसंच, राजकारण्यांसह बिल्डरलॉबीपासूनही सावध व्हा असं आवाहन राज ठाकरेंनी केलं. वरळीत आज मनसेकडून वरळी व्हिजन कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं, तिथे ते बोलत होते.

मला ही बीडीडी चाळ समोर दिसली की मला माझं बालपण आठवतं. वडिलांबरोबर मी येथे येत असे. कोणत्या इमारतीत राहायचे हे आठवत नाही,



पण आमचे डॉक्टर या बीडीडी चाळीत राहायचे, अशी आठवण राज ठाकरेंनी आज सांगितली.

ते पुढे म्हणाले, गेले अनेक महिने बीडीडी चाळीतले लोक येतात, पोलीस बांधव, पोलीस भगिनी येतात, कोळीवाड्यातील बांधव भगिनी येतात. आज काही जाहीर सभा नाही, यामुळे लांबट भाषण करणार नाही. तुम्ही या महाराष्ट्राचे मालक आहात, तुम्ही या मुंबईचे मालक असून का रडताय? बाहेरच्या राज्यातून लोक येतात, झोपडपट्ट्या वसवतात आणि फुटकात सर्व घेऊन जातात. याचं कारण योग्य वेळी योग्य ताकद दाखवत नाही. ऐरवी पाच वर्षे भांड भांड भांडणार आणि ऐन मोक्याच्या वेळी घरंगळत जाणार. आणि त्यांनाही माहितेय की तुम्ही जाऊन जाऊन जाणार कुठे? त्यामुळे तुमचे प्रकल्प रखडत राहणार आणि जे बाहेरून पान २ वर...

# तुमच्या वडिलांची योजना आहे का?

## धोरण: लाडकी बहीण योजना बंद करण्याच्या याचिकेवर संताप

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये दिले जात आहेत. जुलै महिन्यापासून ही योजना सुरू केली असून आतापर्यंत दीड कोटीहून अधिक महिला पात्र ठरल्या आहेत. त्यापैकी कोट्यवधी महिलांच्या खात्यात दोन महिन्यांचा निधीही जमा झाला आहे. मात्र, आता योजनावरून महाविकास



आघाडीने टीका केली आहे. तर ही योजना बंद पान २ वर...

### आरक्षण | मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा

# बीड जिल्हा बंदला जोरदार प्रतिसाद

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी मागच्या १६ सप्टेंबर २०२४ रोजी मध्यरात्रीपासून मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज दादा जरांगे हे आंतरवली सराटी जिल्हा जालना येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. त्या उपोषणाची दखल घेतली नसल्यामुळे बीड बंद आव्हान करण्यात आले होते. शनिवार २१ सप्टेंबर २०२४ रोजी बीड जिल्हा बंदची हाक सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आली होती. दरम्यान बीड जिल्हा बंदला परळी, धारुर, गेवराई, माजलगाव, वडवणी, पाटोदा कडकडीत बंद तर अंबाजोगाई, केज, शिरूर कासार, बीड शहरात संमिश्र प्रतिसाद मिळाला.

मराठा आरक्षणाचा प्रश्न मागच्या अनेक वर्षापासून सरकारने रेंगाळत ठेवला आहे



मागच्या एक ते दीड वर्षापासून मनोज जरांगे पाटील हे सातत्याने आमरण उपोषण करत आहेत इतर आंदोलनामार्फत आरक्षणासाठी रस्त्यावर उतरले आहेत पण अजूनही सरकारनं मराठा आरक्षणाची मागणी मान्य केली पान २ वर...

### उपोषणाला पोहनेर ग्रामस्थांचा पाठिंबा

परळी तालुक्यातील पोहनेर येथे बंद पाळण्यात आला.मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातुन आरक्षण मिळावे यासाठी संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांचे सहावे आमरण उपोषण चालू आहे.यातच त्यांची शारीरिक तब्येत बिघडत असल्या कारणाने मराठा समाज आक्रमक होऊ महायुती सरकार विषयक नाराजगी घोषणेच्या माध्यमातून व्यक्त करत आहे.पोहनेर येथील सर्व व्यापारी बांधवांनी आपले दुकाने बंद केली.या वेळी प्रशासनाच्या वतीने सिरसाळा पोलिस स्टेशन चे पोलिस अधिकारी सोनवणे यांनी बंद चे निवेदन स्वीकारले.यावेळी पोहनेर येथील सकल मराठा समाजा वतीने शांततेने बंद पाळण्यात आला.

# होम मिनिस्टर स्पर्धेला महिलांचा प्रतिसाद

## उपक्रम: मातोश्रीवर देखील महिला भगिनींची अलोट गर्दी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या चार दिवसापासून सुरू झालेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी या कार्यक्रमाला पहिल्या दिवसापासूनच महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळू लागला आहे आजही चौथ्या दिवशी शहरातील मातोश्री मंगल कार्यालयात महिलांनी अलोट गर्दी केली होती

माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून काकू– नाना प्रतिष्ठान आयोजित होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा हा कार्यक्रम बीडच्या मातोश्री मंगल कार्यालय पेठ बीड प्रभाग क्रमांक चार या भागातील महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला, या स्पर्धेचे उद्घाटन सौ.




रूपालीताई सतीश पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महिला आघाडीच्या अध्यक्ष सौ. जयश्रीताई विधाते सौ. राखी राणा चव्हाण सौ. प्रेमलताताई चांदणे, सौ. मनीषाताई क्षीरसागर, डॉ . सुप्रियाताई क्षीरसागर सौ. गंगासागर गोरे, सौ. राजकन्याताई पवार सौ. वर्षाताई लोळगे, डॉ अबोलीताई मसुरे– पांगारकर अंजलीताई पवार सौ. भारतीताई राजेश क्षीरसागर,सौ. कीर्तीताई पांगारकर, सौ.अर्चनाताई पांगारकर प्रमुख महिलांच्या उपस्थितीत व श्री बंडू निसर्गंध , श्री सतपाल लाहोट, डॉ प्रमोद पवार, श्री राजेश क्षीरसागर या प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन झाले. होम मिनिस्टर स्पर्धेला महिलांनी पाण्या पावसाची तमान बाळगता व्यस्त संसारातून आपल्या आनंदासाठी , मन रिजविण्यासाठी या स्पर्धेला उस्फूर्त सहभाग नोंदविला. पान २ वर...

# देशात विचार शुन्यता सर्वात मोठी समस्या

## कार्यक्रम केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

अनिल चौधरी/पुणे

देशात विचारभिन्नता नाही, तर विचारशून्यता ही सर्वात मोठी समस्या आहे. विचारवंत व साहित्यिकांनी राजाच्या विरूद्ध परखड विचार मांडावे. आणि ते सहन करण्याची राजाची तयारी असावी. असे मत केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मांडले.



कोथरूड येथील एमआयटी डब्ल्यूपीयूच्या संत ज्ञानेश्वर हॉल येथे माईर्स एमआयटी विश्वशांती केंद्र (आळंदी) व नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन.पठाण यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा.डॉ. एस.एन. पठाण अमृत महोत्सवी गौरव ग्रंथ (सांप्रदायिक सद्भावनेचा आदर्श) च्या प्रकाशन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. मराठी साहित्य संम्मेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस हे सन्मानीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड होते.

नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन.पठाण, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश तु. कराड आणि डॉ. सर्फराज पठाण उपस्थित होते. या प्रसंगी नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन.पठाण यांच्या विशेष सत्कार व सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. नितीन गडकरी म्हणाले, परखड विचारांवर राजाने चिंतन करणे हीच लोकशाहीची सर्वात मोठी परीक्षा आहे. मतभिन्नता ही लोकशाहीला मान्य नाही. त्यामुळेच दुसर्यांचे मत आपल्या विरोधात असले, तरी त्याचा सन्मान करणे हे लोकशाही मानणार्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. राज्यघटनेने सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. परंतु, जात व धर्म यावर आधारित विषमता अयोग्य आहे. राष्ट्राच्या पुनर्निर्माणाचे स्वप्न साकार करायचे तर या गोष्टी चालणार नाहीत. कोणी कोणाची कशी भक्ती करावी ही वैयक्तिक गोष्टी आहेत. डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, राजकीय नेत्यांनी सर्वधर्मसमभाव संपवला. गडकरींचे राजकीय जीवन निष्कलंक असुन तयांची भुमिका कायम लोकशाहीवादीच राहिली. देशाच्या १४० कोटींना नवा रस्ता दाखविणारे ते बहुआयामी नेतृत्व आहे. वर्तमान काळात संवादाच्या पुलाची गरज असून हिंदू मुस्लिम ऐक्य जपणे गरजेचे आहे. डॉ. पठाण म्हणाले, गावाने मला सांप्रदायिक सद्भावना शिकविली. जीवनात यशस्वी होण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नव्हता, परंतू घराच्या गरिबीमुळे शिक्षण होईल का नाही हे कळत नव्हते. परंतू सातार्याला कमवा शिकवा योजनेतून संपूर्ण शिक्षण पूर्ण केले. नंतर राज्य शिक्षण संचालक आणि नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू या पदापर्यंत पोहचलो. याप्रसंगी सर्जराव निमसे यांनी विचार मांडले. डॉ. सर्फराज पठाण यांनी प्रास्ताविक केले.

# बलात्कार केल्याप्रकरणी एकास जामीन मंजूर

## अ‍ॅड. तेजस नेहरकर:सबळ पुरावे अन् प्रभावी युक्तिवाद

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



घटनेची हकिकत अशी की, १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला. या प्रकरणी आरोपी सुनील सेतुळे रा. केज याच्यावर कलम १३७ (२), ३४ (२) (च्), ६५ (१) भारतीय न्याय संहिता सह कलम ४,५,(ङ),६ .८ बाळ लैंगिक अत्याचार प्रकरणी पोकसो ट्रॉसिटी क्ट सह कलम ३ (१) (), (ळ), ३ (१) (), (ळळ), ३ (२) (ीं) अनुसुचित जाती, जमाती प्रतिबंध कायद्यान्वये पोलिस स्टेशन पिंपळनेर येथे गुन्हा रजिस्टर नंबर २१९/२०२४ अनवये दिनांक ४/०९/२०२४ रोजी पीडितेच्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. व पिंपळनेर पोलिस पथकाने गंभीर गुन्हा असल्यामुळे आरोपीला तात्काळ अटक केले होते. त्यानंतर आरोपीला जामीन मिळविण्यासाठी मा. न्यायालयात जामीन अर्ज तेजस नेहरकर यांच्या मार्फत दाखल करण्यात आला होता. त्यावर आरोपीच्या बाजूने दिलेला भारी भक्कम पुरावा व अतिशय उत्कृष्ट व्यक्तिवाद ग्राह्य धरून व अटी व शर्तीवर आरोपीचा जामीन दिनांक १९/ ०९/ २०२४ रोजी मा.न्यायालयाने मंजूर केला आला आहे. आरोपीचे वतीने ड. तेजस सुभाष नेहरकर यांनी कामकाज पाहिले. या निकालाकडे बीड तालुक्यातील तसेच पिंपळनेर परिसरातील नागरिकांचे लक्ष लागुन होते.

# स्वस्त धान्य दुकानदाराचा मनमानी कारभार

## आक्रमक:भेंड टाकळी ग्रामस्थांचे पुरवठा विभागास निवेदन

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील भेंडटाकळी येथील स्वस्त धान्य दुकानदाराचा मनमानी कारभारामुळे लाभार्थी वैतागले आहेत आम्ही भेंड टाकळी तांडा येथील गावकरी असून सर्व लाभार्थी शासनाच्या स्वस्त धान्याच्या लाभापासून वंचित आहोत. गेली कित्येक वर्षे आम्हाला स्वस्त धान्याचा लाभ मिळालेला नाही.

गेली कित्येक वर्षे आमच्या गावामध्ये धान्याचा काळा बाजार चालू आहे. जर आम्ही राशन दुकानदार यांना काही जाब विचारला तर ते उडवा-उडवीची भाषा करतात. आणि संक्रांती सणाच्या दिवशी महिलांसाठी आलेल्या कीट आल्या होत्या तर त्या सर्वाचे वाटप सुद्धा अद्याप झालेले नाही.शासनाकडुन आलेले स्वस्त धान्यांचा माल बाहेर कुकुटपालनासाठी काळ्या बाजारात विकले जात आहे,



आणि आमचे उसतोड कामगार या हक्कांचे धान्यापासून वंचित राहतात तरी त्यांचे मुले घरी असतात तर राशन दुकानदार यांत्रिक मशीन द्वारे घरो घरी जाऊन आश्वासन देत अंगठे लावून घेतात आणि स्वस्त धन्य स्वताच्या नावावर करून घेतात गोरगरिबांच्या तोंडातला खास हिरावुन घेत असल्याचा आरोप लाभार्थ्यांनी केला आहे.या प्रकरणाची गांभीर्याने दाखल घ्यावी हि सर्व भेंड टाकळी येथील गावकर्याकडून तहसील कार्यालय गेवराई पुरवठा अधिकारी कडे राशन दुकानदारांच्या विरोधात गावकऱ्यांचे वतीने निवेदन देऊन चोकशी करण्यात यावी अशी मागणी अर्जदार काशिनाथ किसन राठोड, विश्वनाथ सिताराम चव्हाण, जनार्दन लिंबा चव्हाण, पिंटू रतन राठोड, सचिन सोपान जाधव, राहुल परमेश्वर राठोड, पापा अंबादास चव्हाण, कैलास जगन्नाथ जाधव, सोपान बंकट चव्हाण, बाळू छगन राठोड, गणपत अंबादास पवार ,प्रदीप संपत पवार ,संदीप बळीराम राठोड, बाळू रतन राठोड ,एकनाथ राठोड ,पवन जगन्नाथ जाधव, यांनी निवेदन देऊन चोकशी करण्यात यावी अशी मागणी केली आहे.



पाटोदा: येथील वार्ड चारमध्ये सिमेंट कॉंक्रिट रस्ताचे उदघाटन करताना सरपंच दशरथ उगले, बाळकृष्ण कुलकर्णी,उपसरपंच समीर पठाण,अविनाश उगले, ग्रा.पं.सदस्य रणजीत पाडूळे, वाजेद पठाण, परमेश्वर सरवदे आदी.

# केजमध्ये मराठ्यांचा कडकडीत बंद!

## आंदोलन:जरांगे पाटलांच्या उपोषणाची तात्काळ दखल घ्या

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षण योद्धे मनोज जरांगे पाटील हे मागच्या चार दिवसांपासून अंतरवाली सराटी येथे सातव्यांदा उपोषणाला बसलेले आहेत. मात्र मागच्या दोन दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावत चालल्याने संपूर्ण सकल मराठा समाज आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे आणि याचाच एक भाग म्हणून सरकारने तात्काळ उपोषणाची दखल घ्यावी यासाठी बीड जिल्हा बंदची हाक दिली होती. त्यानुसार केज शहरात देखील कडकडीत बंद ठेवण्यात आला होता. मागच्या एक वर्षांपासून मराठा आरक्षणासाठी आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील हे वेगवेगळ्या माध्यमातून आंदोलन करत आहेत. सकल मराठा समाजाचा त्यांना मोठ्या प्रमाणावर पाठिंबाही मिळत आहे. मात्र अद्याप मागण्या पूर्ण न झाल्याने



मनोज जरांगे हे अंतरवाली सराटी येथे मागच्या चार दिवसांपूर्वी उपोषणाला बसलेले आहेत. दोन दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावत चाललेली आहे आणि त्यांनी उपचार घेण्यासही नकार दिलेला आहे. दरम्यान, सकल मराठा समाजाच्या वतीने ठिकठिकाणी बंदचे आवाहन करण्यात आले. आज दि.२१ रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. त्यानुसार केजमध्येही कडकडीत बंद पाळण्यात आला आणि सरकारने उपोषणाची तात्काळ दखल घ्यावी असे निवेदन देण्यात आले. प्रशासनाच्या वतीने नायब तहसीलदार आशा वाघ यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी मोठ्या प्रमाणावर सकल मराठा समाजाची उपस्थिती होती.

# पालकमंत्र्यांच्या दौऱ्यात तलाठी गैरहजर

## चर्चा: अंकूश नसल्याचा होतोय आरोप

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह तालुक्यात जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या दौऱ्यात शुक्रवारी महसूल चे तलाठी गायब होते दरम्यान तलाठ्यांना शुक्रवारी उपविभागीय अधिकाऱ्यांनी विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारी बैठकीसाठी सिल्लोडला बोलावून अचानक बैठक रद्द केल्या मुळे पालकमंत्री सत्तार यांच्या दौऱ्यातून तलाठी गैरहजर असल्याचा गोंधळ उडाला होता

पालकमंत्री सत्तार हे शुक्रवारी सोयगाव सह कंकराळा,माळेगाव, पिंपरी, जरंडी, निंबा यती,बहुलखेडा कवली आणि तिखी या गावांच्या पाहणी दौऱ्यावर होते मात्र याच दौऱ्या दरम्यान उपविभागीय अधिकारी सिल्लोड यांनी शुक्रवारी विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारी च्या पार्श्वभूमीवर बैठक लावली या बैठकीसाठी तलाठी सिल्लोडला पोहचता च ही बैठक अचानक रद्द करण्यात आली दरम्यान या कालावधीत मंत्री सत्तार हे नऊ गावांच्या दौऱ्यात होते परंतु तलाठी दौऱ्यातून गायब असल्याने शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीचे प्रश्न सुटले नव्हते त्यामुळे दौरा करूनही सत्तार यांना शेतकऱ्यांच्या समस्या न सोडविता परत फिरावे लागले होते दरम्यान बैठक असताना मात्र तहसीलदार मनीषा मेने या बैठकीला न जाता दौऱ्यात हजर होत्या मग तलाठ्यांना हजर राहण्याचे आदेश दिले नव्हते का असा प्रश्न निर्माण होऊन महसूल चा कारभार चव्हाट्यावर आला आहे.

# जरांगे पाटील समर्थनात उपोषण

## निर्णय: राजुभाऊ शेटेंनी दर्शविला पाठिंबा



नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचा लढा देणारे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा अंतरावली सराठी येथे मराठा समाजाला आरक्षण मिळवण्यासाठी आंदोलन सुरू केले आहे त्याला पाठिंबा दर्शविण्यासाठी नगर येथील तरुणांनी ही समर्थनासाठी उपोषण सुरू केले आहे नगर तहसील कार्यालया समोर गोरक दळवी सखाराम गुंजाळ संतोष अजबे या तिघांनी मराठा आरक्षणाचा लढा देणारे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शविण्यासाठी उपोषण सुरू केले

जो पर्यंत मराठा समाजाला ओबीसी तुन आरक्षण मिळत नाही सग्या सोयऱ्याच्या मागणीची अंमलबजावणी करण्यात येत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच राहणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी राहुरी तालुक्याचे युवा नेतुत्व राजुभाऊ शेटे पाटील यांनी आंदोलनकर्त्यांची नगर येथील उपोषणस्थळी भेट घेऊन त्यांना राहुरी तालुक्याचा वतीने पाठिंबा दर्शविला.

## बोंबला एकाच बाकावर पाच पाच विद्यार्थी

# दोन वर्गाचे विद्यार्थी बसवितात एकाच वर्गात!

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

एकाच बाकावर चक्क वेगवेगळ्या वर्गाचे पाच पाच विद्यार्थी बसून ज्ञानार्जन करत असल्याचा प्रकार सोयगाव तालुक्यातील बहुलखेडा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शनिवारी (ता.२१) उघड झाला आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळांची गुणवत्तेवर प्रश्न चिन्हे निर्माण झाले आहे .

बहुलखेडा येथे इयत्ता एक ते आठवी पर्यंत शाळा आहे या शाळेत शिक्षकांची आठ पदे मंजूर आहे मात्र तिघांना प्रतिनियुक्तीवर घेतल्या मुळे सध्या पाच शिक्षक कार्यरत आहे त्यामुळे एक मुख्याध्यापक पदाचा कार्यभार सांभाळत असून चार शिक्षकांना आठ वर्ग एकत्र करून सांभाळावे लागत आहे त्यामुळे या शाळेत एकाच वर्गात दोन दोन इयत्तेचे विद्यार्थ्यांना एकत्र बसविण्यात येत आहे विद्यार्थी संख्या वाढते झाल्याने एकाच बाकावर विभिन्न वर्गाचे पाच पाच विद्यार्थी बसून शिक्षण घेत असल्याचा धक्कादायक प्रकार ग्रामस्थांनी दिलेल्या भेटीत उघड झाला



> सदर शिक्षक गजानन वरकड यांना नोटीस काढली आहे अद्यापही त्यांनी प्रतिनियुक्तीवर असलेल्या ठिकाणावरून उपस्थिती प्रमाणपत्र सादर केले नाही परंतु त्यांचे वेतन सुरू आहे
>
> -राजेंद्र उंबरकर, मुख्याध्यापक बहुलखेडा

आहे दरम्यान या शाळेत मंजूर असलेल्या आठ शिक्षकां पैकी तीन शिक्षक प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले आहे यामध्ये सुशील आखाडे यांना सोयगाव तहसील कार्यालयात निवडणुकीच्या कामांसाठी प्रतिनियुक्तीवर घेण्यात आले असून दुसऱ्या अन्य शिक्षक प्रमोद पाल्हाळ यांना गटशिक्षणाधिकारी कार्यालयात प्रतिनियुक्तीवर घेण्यात आले मात्र तिसरे गजानन वरकड यांना तर थेट जिल्हा परिषदेने कोणत्याही लेखी आदेश न देता प्रतिनियुक्ती दिली असल्याचे बोलले जाते सदर शिक्षक हे (दि ३०) जुलै पासून विना आदेश शाळेतून गायब आहे एकीकडे जिल्हा परिषद ग्रामीण भागात शिक्षक देतात मात्र सोयगाव तालुक्यातील या शिक्षकांला चक्क जिल्हा परिषदेने परत घेतले आहे सदर गायब असलेल्या या शिक्षकाला मुख्याध्यापक राजेंद्र उंबरकर यांनी तीन सप्टेंबर ला नोटीस बजावून उपस्थित असलेल्या कार्यालयाचे उपस्थिती प्रमाणपत्र सादर करण्याचे नोटिस मध्ये नमूद केले मात्र अद्यापही या शिक्षका चे उपस्थिती प्रमाणपत्र सादर झाले नसून वेतन मात्र नियमितपणे सुरु आहे त्यामुळे या शिक्षकाची अद्यापही प्रतिनियुक्तीवर असलेल्या ठिकाणाचा थांगपत्ता स्थानिक प्रशासनला माहिती नाही या प्रकाराची चौकशी करण्याची मागणी इदबार तडवी,चरणदास चव्हाण, गणेश राठोड, मुसा तडवी यांनी केली आहे.

> बहुलखेडा शाळेतील एका शिक्षका वर शिस्तभंगाची कारवाई अंतर्गत गटशिक्षणाधिकारी कार्यालयात जमा केले होते त्यांना परत त्या शाळेत पाठविण्यात येईल मात्र जिल्हा परिषदेत प्रतिनियुक्तीवर असलेल्या शिक्षकाचा निर्णय वरीष्ठ पातळीवर घेण्यात येईल
>
> -रंगनाथ आढाव
>
> गटशिक्षणाधिकारी सोयगाव

# मराठ्यांच्या दारात मत मागायला येऊ नका

## रोहन गलांडे :आ.नमीता आरक्षणाचा मुद्दा का मांडला नाही?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी




केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांनी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या मराठा आरक्षणाच्या लढ्याला पाठींबा तर दीलाच नाही परंतु अनेकदा मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील केज तालुक्यात आले अंबाजोगाई मध्ये आले परंतु आमदारा नमीता मुंदडा यांनी भेट दिली नाही त्यामुळे आमदारा नमीता मुंदडा यांचा मराठा आरक्षणाला विरोध आहे असे स्पष्ट दीसत आहे असे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे तसेच केज अंबाजोगाई मतदार संघात अनेक गावांमध्ये अमरण उपोषन झाले मोठे मोठे आंदोलन करण्यात आले परंतु आमदारा नमीता मुंदडा यांनी एकाही आंदोलनाला भेट दिली नाही तसेच एका मतदार संघाचे प्रतिनिधित्व करत असताना आमदारा नमीता मुंदडा यांनी मतदार संघात एवढा मराठा आरक्षणाचा मुद्दा पेटलेला असताना एकदा तरी सभागृहात आमदारा नमीता मुंदडा यांनी मराठा आरक्षणाचा मुद्दा मांडला नाही असे रोहन गलांडे यांनी म्हटले आहे तसेच आमदारा नमीता मुंदडा यांनी केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघातील मराठा समाजाची मते घेतली नाही ते त्यांना मराठा आरक्षणाला विरोध करतायत त्यामुळे आमदारा नमीता मुंदडा यांना येणाऱ्या विधानसभेत मराठा बांधवांनी जाती साठी मतदान करु नये व आमदारा नमीता मुंदडा यांनी सुध्दा येणाऱ्या विधानसभेत मराठा बांधवांच्या दाराला मते मागण्यासाठी येऊ नये जाऊ नये असे मत अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज पुण्यभूमी रोहन गलांडे पाटील यांनी व्यक्त केले आहे.



## यंदाच्या पावसाने मुरबाडमध्ये बहरली भातपिके

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यात यंदा ग्रामीण भागात तसेच आदिवासी पट्ट्यात, मुरबाड परिसरात जून महिन्याच्या सुरुवातीपासून ते सप्टेंबरपर्यंत यंदा वरून राजाने चांगल्या प्रकारे वर्षाव केला. त्यामुळे ठाणे जिल्ह्यासह कोकणामध्ये भात पिकाला सुगीचे दिवस आले आहेत. पेरणी ते लोंगे येईपर्यंत वरून राजाने वर्षाव केल्याने चांगल्या आलेल्या भातपीकामुळे शेतकरी राजा आनंदात दिसत आहे. दरवर्षी पावसाचा अनियमितपणा त्यामुळे कोकणातील मुख्य पीक असलेल्या भात पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव होत असायचा. परंतु यंदा जून महिन्यापासून ते गणेशोत्सवापर्यंत वरून राजाने चांगली बरसात केल्याने भातपीक सर्वत्र जोमाने आले आहे. अजूनपर्यंत तरी कोणत्याही रोगाचा प्रादुर्भाव न झाल्याने यंदा शेतकरी वर्ग प्रचंड सुखावला आहे. शेवटच्या क्षणापर्यंत म्हणजेच भात पिकाला लोंब्या येईपर्यंत वरून राजाने चांगली सत्ता ठेवल्याने भात पीक जोमाने डोलत आहे. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात सह्याद्री पर्वताच्या पायथ्यापासून तर थेट मुरबाड तालुक्याच्या शहरी भागापर्यंत तालुक्यामध्ये सर्वत्र भात पीक जोमाने आल्याने यंदा मुरबाड तालुक्यातील शेतकरी वर्ग चांगला सुखावला आहे. शेतीचे पीक जोमाने आल्याने यंदाची दिवाळी मात्र मोठ्या धुमधडाक्यात साजरी करण्यासाठी शेतकरी वर्ग सज्ज झाला आहे.

# ठाण्यात पावसात वाहून गेलेल्या गतिरोधकांना मिळणार नवा मुलामा

## कोपरीत खराब झालेल्या गतिरोधकांची होणार नव्याने बांधणी

◆ ठाणे (प्रतिनिधी):

महापालिका क्षेत्रातील शांत प्रभाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोपरी प्रभागातील रस्त्यावर वाहनांचा वेग सीमित रहावा यासाठी ठिकठिकाणी गतिरोधक बसवले आहेत. मात्र पालिकेच्या सुमार कामामुळे मुसळधार पावसात गतिरोधकच वाहून गेले होते. यासंदर्भात दिलेल्या वृत्ताची दाखल घेत ठाणे महापालिकेने खराब झालेले गतिरोधक नव्याने बांधण्यात सुरुवात केल्याने कोपरीकरांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे.

ठाणे शहराच्या इतर भागांच्या तुलनेत कोपरी भागात वाहनांची वर्दळ तशी बेताचीच असते. याभागात शाळा, महाविद्यालय रुग्णालय, सनदी अधिकारी यांची निवस्थान, रेल्वे स्टेशन, द्रुतगती मार्ग आदी महत्वाच्या गोष्टी आहेत. त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांचा वेग नियमानुसार असावा यासाठी ठाणे महापालिकेने स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार गतिरोधक बांधले आहेत. मात्र नव्याने बांधलेले गतिरोधक खराब झाल्याने कोपरीकरांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

याबाबत 'दै.प्रहार'मध्ये दिलेल्या बातमीनंतर आता गतीरोधक पुन्हा नव्याने बांधून दिले जात आहेत.




महापालिकेत आता लोकप्रतिनिधी नसल्यामुळे कोणती कुठे कामे चालू आहेत हेच समजून येत नाही. त्यामुळे पालिकेच्या नागरी विकास कामांवर कोणाचा अंकुश राहिलेला नाही. गतीरोधकाची बातमी 'प्रहार' दैनिकात आल्यावर झोपलेले पालिका प्रशासन जागे झाले आहे.

**- भरत चव्हाण** (माजी नगरसेवक, ठाणे पूर्व)

यंदा पावसाने दमदार बॅटिंग केली. पाण्याची चिंता काहीशी मिटली असताना, कोपरीमधील गतिरोधकाचे कुचकामी काम सर्वांसमोर आले आहे. गतिरोधकाच्या बांधकाम करण्यासाठी अत्यंत कमी दर्जाचे समान वापरण्यात आले. त्यामुळे मुसळधार पावसात गतिरोधक वाहून गेले. या संदर्भात प्रहारमध्ये कोपरीमधील "कोपरीमधील गतिरोधक पावसाने कुरतडले" या मथळ्याखाली आलेल्या बातमीची दखल पालिकेने घेऊन, जे गतिरोधक खराब झाले आहेत ते दुरुस्त करण्यासाठी सुरुवात केली आहे. ठाणेकर वाडी शांतीनगर या रस्त्यावर लहान मोठ्या आणि अवजड वाहनांची वर्दळ सुरू असते. याच ठिकाणी पालिकेने बांधलेला गतिरोधक पावसात वाहून गेला होता. आता या ठिकाणी नव्याने गतिरोधक बांधला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उपक्रमाचा शुभारंभ

## पारसिक रेतीबंदर विसर्जन घाटावर स्वच्छता अभियानास सुरुवात



◆ ठाणे (प्रतिनिधी):

ठाणे महानगरपालिकेच्या 'स्वच्छता ही सेवा' या अभियानाचा शुभारंभ मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पारसिक रेतीबंदर विसर्जन घाट येथे करण्यात आला. यावेळी पारसिक घाटावर उपस्थित असलेल्या नागरिकांना आरोग्यासाठी स्वच्छता महत्वाची असून प्रत्येकांनी स्वच्छतेबाबत जागरुक राहण्याचे आवाहन करीत मुख्यमंत्र्यांनी सर्वांना स्वच्छतेची प्रतिज्ञा दिली.

मी स्वतः स्वच्छतेच्या बाबतीत जागरुक राहीन, मी स्वतः कुठेही कचरा फेकणार नाही व दुसऱ्यालाही फेकू देणार नाही, त्याचबरोबर स्वच्छ भारत मिशनमधील माझा सहभाग म्हणून माझ्या घरात, माझ्या दुकानात, कामाच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण करुन ओला कचरा हा हिरव्या कचरा पेटीत व सुका कचरा हा निळ्या कचरा पेटीत टाकीन आणि घरगुती घातक कचरा लाल कचरा कुंडीतच टाकेन. तसेच प्लास्टिक व थर्माकोलच्या वापराला प्रतिबंध करुन माझे ठाणे शहर, पर्यायाने माझे राष्ट्र, माझा देश प्लास्टिक व थर्माकोल मुक्त होण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन अशी शपथ देऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'स्वच्छता ही सेवा' या अभियानाचा शुभारंभ केला. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एक पेड माँ के नाम यासाठी नागरिकांना रोपे आणि कंपोस्ट खताचे वाटप करण्यात आले.

स्वच्छता ही सेवा हे अभियान २ ऑक्टोबरपर्यंत देशभरात मोठ्या उत्साहात साजरे जाणार आहे. या अभियानातंर्गत 'एक पेड मा के नाम', 'स्वच्छता कर्मचारी, लाडकी बहीण योजना आणि हरित ठाणेचे प्रतिनिधित्व करणारे सेल्फी पॉइंट उभारण्यात येणार आहेत. तसेच या अभियानातंर्गत शहरात अनेक ठिकाणी क्लीन ड्राईव्ह घेण्यात येणार आहेत. तसेच स्वच्छता अभियान केवळ २ ऑक्टोबरपर्यंत मर्यादित राहणार नाही तर त्यानंतरही ते सुरू राहणार असून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे.

यावेळी खासदार नरेश म्हस्के, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिकत आयुक्त १ संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुकत मनिष जोशी, शंकर पाटोळे, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, कार्यकारी अभियंता सुधीर गायकवाड यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

## वेचक

### आज ठाण्यातील काही भागांत पाणीपुरवठा बंद

**ठाणे :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मुंब्रा, दिवा, कळवा, माजिवडा-मानपाडा व वागळे (काही भागात) प्रभाग समितीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणीपुरवठा करण्यात येतो. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनेच्या



अंतर्गत बारवी गुरूत्व वाहिनीचे कटाई नाका ते शीळ टाकी येथे तातडीचे दुरूस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. परिणामी, ठाणे शहरातील काही भागांचा पाणीपुरवठा आज रात्री १२ वाजेपर्यत २४ तासांसाठी बंद राहणार आहे. सदर शटडाऊन कालावधीत ठाणे महानगरपालिकेअंतर्गत दिवा, मुंब्रा (प्रभाग क्र. २६ व ३१ चा काही भाग वगळता) आणि कळवा प्रभाग समितीमधील सर्व भागामध्ये व वागळे प्रभाग समितीमधील रुपादेवी पाडा, किसननर नं. २, नेहरुनगर तसेच मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत कोलशेत खालचा गाव येथील पाणीपुरवठा २४ तासासाठी पूर्णपणे बंद राहील. पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होईल याची कृपया नागरिकांनी नोंद घ्यावी. सदर पाणी कपातीच्या कालावधीत पाणी काटकसरीने वापरुन ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पालिकेतर्फे करण्यात आले आहे.

### पेंढरी-उंबरवाडी येथे जनावरांना लंपीसारखा आजार

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील नाणेघाटाच्या पायथ्याशी असलेल्या पेंढरी ग्रामपंचायतमधील उंबरवाडी या आदिवासी वाडीत जनावरांना



लंपी सारखा आजार दिसून येत आहे. शिवसेना सहसंपर्क प्रमुख सुभाष पवार यांचे खंदे समर्थक व शिवसेना तालुकाप्रमुख प्रकाश पवार, जिल्हा परिषद ठाणेचे माजी सदस्य संजय पवार यांनी पेंढरी उंबरवाडी येथील नवसू नामा पारधी या आदिवासी शेतकऱ्याच्या जनावरांना लंपी सारखा आजार झाल्याचे समजतात भेट दिली. घटनास्थळावरून प्रकाश पवार यांनी कर्तव्यदक्ष पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. धनंजय माधले यांच्याशी संपर्क साधून आजारी जनावरांचे फोटो पाठवले असता गुरुवारी सकाळी संबंधित जनावरांच्या आजारावर निदान करून उपचार केला जाईल असे त्यांनी सांगितले. यावेळी विलास घरत, राजेश राऊत, दत्तात्रय विशे, शिवाजी घोलप, ग्रामपंचायत सदस्य डॉ. चिमा खंडवी उपस्थित होते.

### रवींद्र पाटील सावित्रीबाई फुले राज्यशिक्षक पुरस्काराने सन्मानित



**कल्याण :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शिक्षक रवींद्र पाटील यांना सावित्रीबाई फुले राज्यशिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. घरची परिस्थिती हालाखीची असताना शिक्षण घेऊन आपल्या उपजीविकेसाठी कल्याणला आलेले रवींद्र पाटील मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत गोरगरीब मुलांना गेल्या ३२ वर्षापासून घडवित आहेत. विद्यार्थ्यांना शिकविण्याबरोबर त्यांना सामाजिक कार्याची सुद्धा आवड आहे. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील संस्थांशी त्यांची नाळ जुळलेली आहे. गेल्या बारा वर्षापासून धारावीतील तळागाळातील विद्यार्थ्यांना आनंदमय शिकवत पवित्र कार्य करीत आहेत. मुंबई महानगरपालिका क्षेत्रात रवी पाटील उपक्रमशील शिक्षक म्हणून ओळखले जातात. ते बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उत्तर विभागातील संत कवकया मार्ग मनपा हिंदी शाळा क्रमांक २ चे वरिष्ठ शिक्षक पदावर काम करीत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणूनच मुंबई महानगरपालिका विभागातून रवींद्र पाटील यांना शासनाच्या वतीने सावित्रीबाई फुले राज्यशिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

### टिटवाळा उपविभागातील वीज चोरांविरुद्ध गुन्हे दाखल

**कल्याण :** महावितरणच्या टिटवाळा उपविभागात वीज चोरांविरुद्ध धडक मोहीम सुरू आहे. उपविभागातील सर्वाधिक गळती असलेल्या वीज वाहिनीवर गेल्या १ ऑगस्ट ते १७ सप्टेंबर या दीड महिन्यात केलेल्या तपासणीत १८४ जणांकडे ४४ लाख रुपयांची वीजचोरी आढळली. या सर्व १८४ जणांविरूद्ध वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार वीजचोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा आणि कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता दिलीप भोळे, कल्याण ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता विनय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली मांडा-टिटवाळा शाखा कार्यालयांतर्गत टिटवाळा मंदिर, बल्याणी, बनेली, मांडा पश्चिम भागात १३४ तर गोवेली शाखेंतर्गत म्हारळ व वरप भागात ५० जणांकडे वीज चोऱ्या आढळून आल्या. यात वीजबिल थकबाकीमुळे कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित केलेल्या ४० ग्राहकांचा समावेश आहे.

## सुविधा न मिळाल्यास रोजंदारी कर्मचाऱ्यांचा कामबंद आंदोलनाचा इशारा

◆ नवी मुंबई (वार्ताहर) :

महापालिकेच्या परिवहन विभागात काम करणाऱ्या रोजंदारी तसेच ठोक मानधनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या समस्यांचे निवारण करुन त्यांना सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत महाराष्ट्र कर्मचारी युनियनचे अध्यक्ष रविंद्र सावंत यांनी महापालिका आयुक्त कैलाश शिंदे यांच्याकडे लेखी निवेदनातून मागणी केली असून सुविधा न मिळाल्यास २३ सप्टेंबर रोजी काळ्या फिती लावून काम करायचे व त्यानंतर कामबंद आंदोलन करणार असल्याचा इशारा कामगार नेते रविंद्र सावंत यांनी महापालिका प्रशासनाला दिला आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन उपक्रमामध्ये रोजंदारी तसेच ठोक मानधनावर वाहक आणि चालक कार्यरत आहेत. प्रशासनामध्ये आज ना उद्या आपली सेवा कायम



होईल या आशेवर हे कर्मचारी गेली १५ ते १६ वर्षे इमानेइतबारे काम करत आहेत. या कर्मचाऱ्यांची सेवा तर कायम झाली नाहीच, पण त्यांना पगारवाढही प्रशासनाने दिलेली नाही. त्यांच्या समस्यांचे निवारण होत नाही, त्यांना माफक प्रमाणावर सुविधा उपलब्ध करुन देण्यासही प्रशासनाने आजवर टाळाटाळच केली आहे.

रस्त्यावर प्रवासी सुविधा देताना बसला अपघात होऊन कोणी कर्मचारी घरी बसल्यास त्यास आजारपणावरील उपचाराचा खर्चही भेटत नाही. प्रशासनाकडे विचारणा केल्यास, तशी तरतूद नसल्याचे सांगण्यात येते. अनेक चालक-वाहक फाटक्या कपड्यात काम करताना पहावयास मिळतात. २०१० मध्ये ठाणे कामगार आयुक्तांच्या आदेशाने आणि परिवहन समिती महासभेच्या ठरावानुसार परिवहन उपक्रमातील ठोक व रोजंदारीवर असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना सरसकट कायम करणे आणि २०१० ठरावानुसार कनिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. या कर्मचाऱ्यांची पगारवाढ करणे, त्यांच्या आरोग्यसुविधेसाठी मेडिक्लेमची सुविधा देणे, कामासाठी ड्रेस देणे, आजारपणाची भरपगारी रजा देणे या मागण्या प्रशासनाकडे प्रलंबित आहेत. प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्या लवकर मान्य करुन त्यांना न्याय द्यावा अन्यथा प्रशासनाच्या विरोधात दिनांक २३ सप्टेंबर रोजी काळ्या फिती लावून काम केले जाईल. त्यानंतरही प्रशासनाला जाग न आल्यास 'कामबंद आंदोलन'छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला.

## डोंबिवली बनणार 'ग्रीन एनर्जी सिटी'



**कल्याण :** राज्याची सांस्कृतिक उपराजधानी अशी बिरुदावली मिळवलेल्या डोंबिवली शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. डोंबिवलीतील हाऊसिंग सोसायट्यांमध्ये आता सोलर पॉवर युनिटद्वारे वीजनिर्मिती केली जाणार असून सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून ही अभिनव योजना कार्यान्वित होत आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात १४ गृहसंकुलाना आज सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या हस्ते सोलर पॅनल वाटप करण्यात आले. हाऊसिंग सोसायट्यांमधील सार्वजनिक वापराच्या विजेचे येणारे जास्त बिल, या बिलात सातत्याने होणारी वाढ, या दरवाढीचा सोसायटी मेंटेनन्सच्या दरावर होणारा प्रतिकूल परिणाम आदी प्रमूख समस्यांना सोसायटी पदाधिकाऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. यावर काय उपाय करता येईल का या दृष्टीने डोंबिवलीतील सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये मोफत सोलार पॉवर युनिट बसवण्याची योजना बऱ्याच वर्षांपासून आपल्या मनात असल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितले.

## नार-पार नदी जोड प्रकल्पाला मिळाली तात्पुरती मंजुरी

**कल्याण :** नारपार गिरणा नदी जोड प्रकल्पावरून महाराष्ट्रात वातावरण तापले आहे. नार-पार नदी जोड प्रकल्पाला तात्पुरती मंजुरी मिळाली असली तरी तो निवडणुकीचा जुमला आहे. राज्य सरकारने १०.६४ टी.एम.सी. पाणी देण्याची घोषणा करून जनतेची दिशाभूल करून फसवणूक केली जात आहे. यामुळे उत्तर महाराष्ट्रातील सामाजिक संघटना आक्रमक झाल्या आहेत. कल्याणमधून खांदेशी आमदार आणि मंत्र्यांना साडीचोळीचा आहेर पाठविला आहे.

चितळे समितीच्या अहवालावरून ३० टी.एम.सी. पाणी उत्तर महाराष्ट्राला मिळावे अशी मागणी खांदेश हित संग्राम संघटनेची आहे. याबाबत उत्तर महाराष्ट्रातील आमदार आणि मंत्री आपली भूमिका स्पष्ट मांडत नसल्याचा आरोप करत आंदोलनाच्या भूमिकेत खांदेश हित संग्राम संघटनेकडून जवळपास खांदेशी २५ आमदार आणि मंत्र्यांना साडी चोळीचा आहेर कल्याणमधून कुरियरद्वारे पाठवण्यात आला.

## नूतन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दिला अक्षर गणेशातून पर्यावरण संदेश

◆ कल्याण (वार्ताहर) :

कल्याणमधील नूतन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अक्षर गणेशातून पर्यावरण संदेश दिला असून विद्यार्थ्यांनी साकारलेल्या अक्षरगणेश चित्र प्रदर्शनाचे आयोजन आज करण्यात आले होते. छत्रपती शिक्षण मंडळाच्या नूतन विद्यालयात विद्यार्थ्यांनी गणपती सुट्टीत स्वतःच्या नावाचा अक्षरगणेश तयार केला. त्यावर पर्यावरण विषयी झाडे लावू झाडे जगवू, मी पर्यावरण स्नेही, स्वच्छ भारत आरोग्य संपन्न भारत, प्लास्टिकचा वापर टाळा, निसर्ग माझा मित्र, कचरा करू कमी आरोग्याची मिळेल हमी, पर्यावरण संवर्धन काळाची गरज, कापडी पिशवी घरोघरी पर्यावरण रक्षण करी असे सामाजिक संदेश देणारे घोषवाक्ये लिहिली. या स्तुत्य उपक्रमासाठी शाळेचे कलाशिक्षक श्रीहरी पवळे यांनी मार्गदर्शन केले.



विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या अक्षर गणेश प्रदर्शन शाळेच्या हॉलमध्ये भरविले असून या प्रदर्शनाचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका रेश्मा सय्यद यांनी केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेले स्वतःच्या नावातून अक्षरगणेश अतिशय कल्पकतेने तयार करून सुरेख रंगसंगतीत रंगकाम केल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. हे प्रदर्शन बुधवार (दि. २५)पर्यंत शाळेतील विद्यार्थी, पालक परिसरातील हितचिंतक यांना पाहण्यासाठी सुरू ठेवण्यात येणार आहे.

## एमसीएचआयतर्फे 'रासरंग २०२४'ची ३ ऑक्टोबरपासून सुरुवात

◆ ठाणे (वार्ताहर) :

ठाणे शहरात यंदाही नवरात्रोत्सवात 'रासरंग २०२४' उत्सव भरविला जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'क्रेडाई-एमसीएचआय'ने २०१७ मध्ये सुरू केलेला हा कार्यक्रम यंदा नवी उंची गाठणार असून, ठाण्यातील हरिओम नगर येथील जकात नाक्यावरील भव्य मैदानावर ३ ते १२ ऑक्टोबर दरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता मातेच्या आरतीने उत्सवाला सुरुवात होणार आहे. या उत्सवाचे नुकतेच भूमिपूजन करण्यात आले.

'क्रेडाई-एमसीएचआय' ठाणेचे अध्यक्ष जितेंद्र मेहता यांनी भूमिपूजनानंतर आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत माहिती दिली. तत्पूर्वी भूमिपूजन कार्यक्रमाला शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के, माजी नगरसेवक विकास रेपाळे, नम्रता भोसले, 'क्रेडाई-एमसीएचआय' ठाणेचे अध्यक्ष जितेंद्र मेहता, 'एमसीएचआय'चे पदाधिकारी सचिन मिराणी, फैयाज मिराणी, अमरसिंह ठाकूर, भरत मेहता, भावेश गांधी, कल्पतरु डोअर्सचे व्ही. के. पटेल, को-ऑर्डिनेटर जय ठक्कर आदी उपस्थित होते. ठाण्यात रास-रंग उत्सवात बॉलिवूडमधील 'ढोल किंग' हनिफ, अस्लम आणि उमेश बारोट यांच्या उपस्थितीत प्रसिद्ध गायिका द्रविता चोक्सी ओबेरॉय, फिरोज लडका, हेली मुझुमदार, रूपाली कश्यप यांच्या सूरामध्ये भाविकांना दांडियाचा आनंद लूटता येणार आहे. विजेची आकर्षक रोषणाई आणि सुरेल संगीताच्या ठेक्यामध्ये भाविकांना पारंपरिक वेशभूषा करून दांडिया नृत्याचा आनंद लुटता येईल.

या कार्यक्रमाचे www.rass-rang.in या वेबसाईटवर प्रसारण केले जाणार आहे.

### वायले नगर येथे मण्यार सापाला जीवनदान

**कल्याण :** कल्याण पश्चिम येथील वायले नगर, निळकंठ पार्क येथील बिल्डिंगमध्ये छोट्या फटीत विषारी असलेला मण्यार (कॉमन क्रेट) साप होता. सापाला बघून नागरिकांची गर्दी झाली होती. त्याठिकाणी सर्पमित्र सुहास पवार यांनी बिल्डिंगमध्ये फटित असलेल्या सापाची तत्काळ सुटका केली. तसेच ज्येष्ठ सर्पमित्र दत्ता बोंबे, हितेश करंजकर यांच्या सहकार्याने निसर्गमुक्त करणारं असल्याचे स्थानिकांनी रहिवाशांनी सांगितले. मण्यार साप हा जहाल विषारी असून निशाचर म्हणजे रात्रीच्या वेळी शिकार करण्यास बाहेर पडतो. रात्रीच्या वेळी जमिनीवर झोपल्यास त्याच्या अंथरुणात ऊब मिळवण्यास हा साप जातो. अशा वेळेस कुस बदलल्यास ह्या सापाचा सर्दंपश होतो. ग्रामीण भागात झोपताना मच्छरदाणी व टॉर्चचा वापर केल्यास अशा दुर्घटना टाळता येतील असे माहिती सुहास पवार यांनी दिली.

डायलिसिस सेंटरमध्ये सहा महिन्यांत रुग्णांचे १००० सेशन

# सिव्हिल रुग्णालय बनले किडनी रुग्णांसाठी आधारवड

◆ ठाणे (प्रतिनिधी):

ठाणे सिव्हिल रुग्णालयात किडनी रुग्णांसाठी आधारवड ठरताना दिसून येत आहे. रुग्णालयातील डायलिसिस सेंटरमध्ये गेल्या सहा महिन्यात रुग्णांचे एक हजार सेशन झाले असून, आता दोन सत्रात सुरू झालेल्या या सेंटरमध्ये जास्तीत जास्त रुग्णांनी फायदा घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

रक्तातील अशुद्ध घटक बाहेर फेकण्याचे नैसर्गिक काम किडनी मार्फत होत असल्याने, माणसांसाठी किडनी खूप महत्वाचे कार्य करत असते. मात्र किडनीची प्रक्रिया



मंदावल्यावर प्रत्येक व्यक्तीला डायलिसिस करणे ही गरज बनते. सर्वसामान्यांसाठी नियमित डायलिसिस खर्च परवडणारा नसतो. त्यामुळे अनेकांसाठी किडनीचा त्रास नकोसा होतो. परंतु अशा रुग्णांसाठी ठाणे सिव्हील रुग्णालयात विशेष कक्ष तयार केला आहे. सुसज्ज असणाऱ्या डायलिसिस सेंटरमध्ये दर दिवशी रुग्णांवर उपचार होत आहेत. गेल्या सहा महिन्यात एक हजार डायलिसिस सेशन झाले असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी दिली.

डायलिसिस सेंटरमध्ये एकूण १४ मशीन असून, यापैकी एका सत्रात नऊ रुग्ण उपचार घेऊ शकतात. रुग्णांची संख्या वाढली तर उर्वरित मशीन उपयोगात आणल्या जाणार आहेत. अद्यावत ठेवलेल्या डायलिसिस सेंटर पुढील टप्प्यात दोन ते तीन सत्रात सुरू ठेवले जाणार आहे.

रक्तातील जे दूषित पदार्थ साठून राहतात ते बाहेर काढण्याची प्रक्रिया म्हणजे डायलिसिस. आपली किडनी हेच काम नैसर्गिकरित्या करत असते. किडनी जेव्हा रक्त शुद्धीकरणाचे काम थांबवते त्यावेळी डायलिसिसची आवश्यकता भासते. डायलिसिस सेंटरमध्ये जिल्ह्याच्या विविध भागातून रुग्ण उपचार घेण्यासाठी येत आहेत. या सेंटरचा उपयोग जास्तीत जास्त रुग्णांनी घ्यावा हाच प्रयत्न जिल्हा आरोग्य विभागाचा आहे.

**- डॉ. कैलास पवार** (जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे)

## शिक्षक संघटनांचा आंदोलनाचा इशारा
## २५ सप्टेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

◆ मुरबाड (वार्ताहर):

राज्यातील प्राथमिक शिक्षणावर दुरगामी परिणाम करणाऱ्या अन्यायकारक शासन आदेशाविरोधात राज्यातील सर्व शिक्षक संघटना २५ सप्टेंबर रोजी राज्यातील सर्व प्राथमिक शाळा बंद ठेवून सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढणार असल्याचे ठाणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भगवान भगत यांनी सांगितले आहे. राज्यातील सर्व संघटनांची एक महत्वपुर्ण बैठक नुकतीच शिक्षक नेते संभाजी थोरात, मध्यवर्ती संघटनेचे राज्याध्यक्ष केशव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख उपस्थितीत पुणे येथील शिक्षक भवनात संपन्न झाली.




महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षक संचमान्यतेबाबत दि. १५/३/२०२४ चा व कंत्राटी शिक्षक भरती बाबतचा दि. ५/०९/२०२४ चा शासन निर्णय वाडी वस्तीवरील विदयार्थ्यांवर अन्यायकारक असल्याने सदरचे दोन्ही शासन निर्णय रद्द करावेत या मागणीसाठी राज्यातील सर्व प्राथमिक शाळा दि. २५ सप्टेंबर रोजी बंद ठेवून राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्धार पुणे येथे नुकत्याच झालेल्या राज्यातील सर्व संघटनांच्या बैठकीत घेण्यात आला. गुरुवारी झालेल्या बैठकीत शासनाच्या अन्यायकारक शासन निर्णयामुळे राज्यातील १५ हजार शाळांमधील १ शिक्षक कमी होवून १५ हजार शाळांमधील सुमारे २ लाख विद्यार्थ्यांवर अन्याय होणार असल्याने सदरचे शासन निर्णय शासनाने तात्काळ मागे घ्यावेत असे मत संघटना प्रतिनिधींनी व्यक्त केले.

# ३५ रुग्णांना शस्त्रक्रीयेसाठी पाठविले जाणार

## मोतीबिंदू व शस्त्रक्रिया शिबिरात १८० रुग्णांची तपासणी

देशोन्नती वृत्तसंकलन

**आंबा चोंडी :** वसमत तालुक्यातील चौंडी बहिरोबा येथे राजु भैय्या नवघरे सेवा प्रतिष्ठानच्या वतीने मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरात १८० रुग्णांची तपासणी करून ३५ रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी उदगीर येथे पाठविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.



तोंडी बहिरूबाई येथे राजू भैय्या नवगरे सेवा प्रतिष्ठानच्या वतीने मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात ग्रामस्थांनी तपासणीसाठी चांगला प्रतिसाद दिला. या शिबिरात एकुण १८० रुग्णांची तपासणी करण्यात आली असून त्यातील ३५ रुग्णांच्या शस्त्रक्रियेसाठी लवकरच उदगीर येथे नेण्यात येणार असल्याची सेवा प्रतिष्ठानच्या वतीने सांगण्यात आले. यावेळी सेवा प्रतिष्ठानचे ग्रामस्थांचे आभार मानले. यावेळी लॉयन्स क्लब उदगीर येथील तज्ञ डॉ. अविनाश अघोर, सेवा प्रतिष्ठानचे सेवाधुत बाळासाहेब चव्हाण, उपसरपंच एड.उदयसिंह जाधव, राजकुमार जाधव, गजानन मुदनर, नामदेव जाधव, संतोष जाधव, संदीप चोंडीकर, दत्ता जाधव ,वैभव पावडे आदींची उपस्थिती होती. यावेळी लायन्स क्लब उदगीर व व राजू भैय्या नवघरे सेवा प्रतिष्ठानचे कर्मचाऱ्यांनी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले घेतले.

# सिंसिअर टेनिस अकादमीचे तीन खेळाडू विभागीय स्पर्धेकरिता पात्र

देशोन्नती वृत्तसंकलन

**नागपूर :** क्रीडा व युवक सेवासंचनालय,नागपूर विभाग व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वर्धाद्वारा आयोजित शालेय नागपूर विभागीय टेनिस स्पर्धा २०२४-२५, १७ व १९ वर्षाखालील मुले मुले यांचे सामने १८ व १९ सप्टेंबर रोजी वर्धा येथे संपन्न झाले. यात सिंसीअर टेनिस अकॅडमीचा खेळाडू १९ वर्षाखालील मुलांच्या गटात अरमान पाटील( संचेती ज्यू कॉलेज, बेसा) याने प्रथम स्थान पटकावले तर १७ वर्षाखालील मुलांच्या गटात हेरंभ पोहणे (माउंटफोर्ट स्कूल, वर्धा रोड.) हा प्रथम स्थान प्राप्त करून विजेता ठरला.

१७ वर्षाखालील मुलींच्या गटात उपविजेता श्राव्या रामभजन ही ठरली व या सर्व तिन्ही खेळाडूंची निवड शालेय राज्यस्तरीय स्पर्धेकरिता नागपूर विभागाच्या संघात झाली आहे. अरमान पाटीलने उपांत फेरीत अजय झाम याला ७-३ ने तर अंतिम सामन्यात ऋषिकेश शेन्द्रे याला १०-०३ ने पराभूत करून राज्यस्तरीय स्पर्धेकरिता पात्र ठरला. हेरंभ पोहणे याने उपांत पूर्व फेरीत आलोक मिश्रा ला ७-२, उपांत फेरीत



अक्षत दक्षिणदास याला ७-२ तर अंतिम सामन्यात भव्य पोरवल ला १०-०८ ने पराभूत करून राज्यस्तरीय स्पर्धेकरिता पात्र ठरला.

हे सर्व खेळाडू शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या क्रीडांगणावर सचिन पाटील सर यांच्या नेतृत्वाखाली नियमित सराव करतात. निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ. राज गजभिये, उपअधिष्ठता डॉ.माहुरे, डॉ. गोलावर, आंबेडकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए.पी. जोशी, जी.एम.सी. टेनिस क्रीडांगण प्रमुख डॉ. मुकेश वाघमारे ,संजय भिवगडे, सोनल गोळे, वैभव कुंभरे, व चेतन उके व सर्व सिंसीआर टेनिस अकॅडमीच्या सदस्यांनी व पालकांनी अभिनंदन केले व येणाऱ्या स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

# सुस्कृंत बाल नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी २६ व २७रोजी

देशोन्नती वृत्तसंकलन

**नागपूर :** कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, (विस्तार सेवा मंडल) रामटेक व बालरंगभूमी परिषद, शाखा-नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने घेण्यात येत असलेल्या संस्कृत बालनाट्य स्पर्धेची अंतिम फेरी येत्या, २६ व २७ सप्टेंबर रोजी कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे सकाळी ८.३० वाजतापासून होणार आहे. या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, यवतमाळ, मौदा व नागपूर येथील २६ शाळांनी सहभाग नोंदविला. या फेरीतून उत्कृष्ट १८ संघाची निवड करण्यात आली. या फेरीचे परीक्षण अभय अंजीकर व डॉ. वीणा गानू यांनी केले. अंतिम फेरीतील सर्वोत्कृष्ट संघ २६ सप्टेंबर रोजी सादरीकरण करणार आहे. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा २७ तारखेला सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात येणार आहे. पहिल्या उत्कृष्ट तीन विजेत्यांना पारितोषिक व स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात येईल.

# हिंगोली नगर परिषदतर्फे एक वृक्ष आईच्या नावे मोहीम

देशोन्नती वृत्तसंकलन

**हिंगोली :** स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय भारत सरकार यांनी स्वच्छता पंधरवाडा अंतर्गत १७ सप्टेंबर, २०२४ ते दि. ०१ ऑक्टोबर दरम्यान 'स्वच्छता ही सेवा'(एए) पंधरवाड्याचे आयोजन करून 'स्वभाव स्वच्छता- संस्कार स्वच्छता' हि संकल्पना राबविण्याचे निर्देश दिले आहेत. या अनुषंगाने नगरपालिके मार्फत शहरात विविध उपक्रम,लोकसहभाग,जनजागृती करणे बाबत आदेशित केले आहे.

त्याअंतर्गत हिंगोली नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपालिके मार्फत स्वच्छता हि सेवा अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये श्रमदान, स्वच्छता शपथ,एक पेड मा के नाम, विविध स्पर्धा, जनजागृती पर कार्यक्रम, सेल्फी पॉइंट, पथनाट्ये, स्वच्छता पाठशाला, ई. कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्यानुसार २० सप्टेंबर रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा कोषागार कार्यालयाच्या रस्त्यावरील मध्यभागी असलेल्या डिव्हायडरमध्ये एक पेड मा के नाम उपक्रम राबविण्यात आला असून यामध्ये आईच्या



नावाने एक झाड लावण्यात आले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा कोषागार अधिकारी झुंझारे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आले. तसेच यामध्ये जिल्हा कोषागार कार्यालयाचे अधिकारी/कर्मचारी, बांधकाम विभागाचे इंजि. धाडवे, हरदीपसिंग भाटीया, नगर पालिकाचे उपमुख्याधिकारी शाम माळवटकर, लेखापाल अनिकेत नाईक, इंजि. वसंत पुतळे, राजेश पदमने, किशोर काकडे, प्रवीण मोहेकर, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, आकाश देशमुख, संदीप घुगे, विनय शाहू, आशिष रणसिंगे, अशोक गवळी, पंडित मस्के, विजय रामेश्वरे, भागवत धायतडक, सनोबर तसनीम, कमलेश इंगळे, आकाश गायकवाड, अथर्व वर्मा, रवी जोंधळे, चेतन भूजवने आदी कर्मचारी उपस्थित राहून सदर वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला.



पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते पी.एम. मित्र पार्कचा शिलान्यास

आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजना आणि पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्ट अप योजनेचा शुभारंभ

# वस्त्रोद्योगाला नवी झळाळी मिळेल : पंतप्रधान

देशोन्नती वृत्तसंकलन

**वर्धा :** महाराष्ट्रात मोठ्या औद्योगिक विकासाची क्षमता असून त्यात वस्त्रोद्योग हा अग्रणी आहे. विदर्भात कापसाचे क्षेत्र मोठे असूनही येथील शेतकऱ्यांची यापूर्वी उपेक्षा झाल्याची खंत व्यक्त करुन प्रधानमंत्री मोदी म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली २०१४ मध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर नांदगाव खंडेश्वर येथे टेक्सटाइल पार्कची निर्मिती झाली. आता अमरावती येथे होत असलेले पीएम मित्रा पार्क हे वस्त्रोद्योगास नवी झळाळी प्राप्त करुन देण्याच्या प्रयत्नातील पुढचे पाऊल आहे. असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी वर्धा येथे व्यक्त केला.

पीएम विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा वर्धा येथील स्वावलंबी मैदानात आज पार पडला. तसेच अमरावती येथील पीएम मित्रा पार्कचे ई-भूमिपूजन आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजना या राज्य शासनाच्या दोन योजनांचा शुभारंभही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाला. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बोलत होते.

प्रधानमंत्री पुढे म्हणाले, फार्म टू फायबर, फायबर टू फॅब्रिक, फॅब्रिक टू फॅशन आणि फॅशन टू फॉरेन अशा सुत्रातून आमचे प्रयत्न सुरू असून विदर्भातील उच्च दर्जाच्या सूतापासून तयार होणारे कपडे परदेशात निर्यात होऊन येथील शेतकरी समृध्द होतील. अमरावतीच्या पार्कमध्ये दहा हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित असून १ लाखाचा रोजगार उपलब्ध होईल. औद्योगिक विकासासाठी पुरक असणाऱ्या विविध पायाभूत सुविधांचा महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. विदर्भातील सिंचन विकासासाठी महत्वपूर्ण ठरणाऱ्या वैनगंगा-नळगंगा योजनेच्या अंमलबजावणीतून १० लाख एकर क्षेत्र सिंचित होणार आहे. याशिवाय कांदा, सोयाबीन उत्पादकांनाही विविध निर्णयाच्या माध्यमातून सरकार मदत करत आहे, असे प्रधानमंत्र्यांनी आवर्जून सांगितले.

राज्यपाल डॉ.सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी, केंद्रीय राज्यमंत्री जयंत चौधरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, वनमंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, डॉ.पंकज भोयर, दादाराव केचे, समीर कुणावार, माजी खासदार रामदास तडस, प्रभारी विभागीय आयुक्त डॉ.विपीन ईटनकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आदींची उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले, देशातील सात पीएम मित्रा पार्कपैकी अमरावती येथे होत असलेल्या पार्कच्या माध्यमातून कापसापासून कापडापर्यंत व कापडापासून फॅशनपर्यंतच्या सर्व प्रकारच्या एकत्र सुविधा उपलब्ध होणार आहेत. यामुळे मोठ्या गुंतवणुकीसह रोजगार उपलब्ध होईल. पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या बारा बलुतेदारांच्या विकासाचा विचार अद्यापपर्यंत कोणीही केला नाही, परंतू प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पीएम विश्वकर्मा सारख्या योजनेच्या माध्यमातून बाजारपेठेला अनुकूल असलेल्या वस्तुंची निर्मिती करण्यासाठी प्रशिक्षणासह आर्थिक सहाय्य कारागिरांना उपलब्ध करून दिले आहे. याचा लाभ समाजातील शेवटच्या कारागिरापर्यंत पोहोचत आहे. बलुतेदार समाजसमुहाच्या जीवनात परिवर्तन घडविण्याची मोठी संधी या योजनेमधून उपलब्ध झाले असल्याचे सांगून शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय घेतल्याबद्दल उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रधानमंत्र्यांचे आभार मानले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पीएम मित्रा पार्कच्या माध्यमातून विदर्भासह राज्याच्या औद्योगिक क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. या पार्कमुळे पांढ्या सोन्याला खऱ्या अर्थाने सोन्याचे दिवस येणार असून येथे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अत्यंत कमी कालावधीमध्ये मोठे प्रकल्प गतिमानतेने पुर्ण केल्यामुळे पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा विक्रम केला असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी सांगितले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक उद्योजक महाराष्ट्रात गुंतवणुक करण्यास उत्सुक आहेत. गडचिरोली येथे स्टील उद्योग तसेच महापे येथे सेमी कंडक्टर या उद्योगांचा यामध्ये समावेश आहे. प्रधानमंत्र्यांच्या विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी आमचे सरकार संपुर्ण योगदान देईल, असा विश्वास यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

## परंपरागत कारागिरांच्या आर्थिक प्रगतीसाठी पीएम विश्वकर्मा योजना महत्वाची : मुख्यमंत्री

देशातील गरीब, वंचित तसेच परंपरागत व्यवसाय करणाऱ्या कारागिरांच्या आर्थिक प्रगतीसाठी पीएम विश्वकर्मा ही योजना अत्यंत महत्वाची आहे. या योजनेच्या माध्यमातून कारागिरांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याला प्राधान्य राहणार असल्याचे सांगतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा देशाचे नेतृत्व करत आहेत, त्यांच्या खंबीर पाठबळामुळे राज्याची प्रगती गतिमानतेने होत आहे. अमरावती येथे पीएम मित्रा पार्क हा देशातील वस्त्रोद्योगाच्या विकासाला चालना देणारा ठरणार आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कापसावर प्रक्रिया करून कापड निर्यातीला चालना मिळणार आहे. या पार्कमध्ये १० हजार कोटीची गुंतवणुक होणार असून सुमारे १ लाखापेक्षा जास्त रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनांमुळे राज्यातील महिला व इतर घटकांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीला पोषक ठरणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.

# रोपवाटिकेला जिल्हाधिकाऱ्यांनी दिली भेट



**हिंगोली :** १९ सप्टेंबर रोजी सेनगाव तालुक्यातील लिंगदरी येथील सामाजिक वनीकरण विभागाअंतर्गत सुरू असलेल्या रोपवाटिकेला जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी भेट देऊन उच्चतंत्रज्ञान रोपवाटिकेमध्ये तयार करण्यात आलेल्या आधुनिक पॉलिहाऊस, शेडनेट , मिस्ट चेंबर , इरिगेशन सिस्टीम याची पाहणी करून समाधान व्यक्त केले. तसेच रोपवाटिकेतील तयार रोपे आणि त्याचे वाढ पाहून आनंद व्यक्त केला येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणात रोपे तयार करण्याचे मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या. त्यांच्या हस्ते वृक्षारोपण ही करण्यात आले. यावेळी विभागीय वन अधिकारी पुष्पा पवार , वन परिक्षेत्राधिकारी व्ही.बी. टाक, वनपाल एस. बी . कीर्तनकार, बिरसोने, वनरक्षक शिंदे, लोणे, घुगे, पंडित आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

# तेलाबरोबर सोयाबीनचेही भाव वाढले

देशोन्नती वृत्तसंकलन

**वाशिम :** वाशिम काही दिवसांपूर्वी सोयाबीन तेलाचे दर प्रत्येक किलोग्राम मागे वीस रुपये याप्रमाणे वाढल्याचे जाहीर करण्यात आले होते. सोयाबीन तेल भाव वाढीबरोबरच सोयाबीन दरातही थोडाफार फरक झाला असून क्विंटल मागे शंभर ते दोनशे रुपयांनी वाढ झाली आहे. यामुळे शेतकरीवर्ग थोडा फार सुखावला आहे .मात्र शासनाने सोयाबीन तेलाच्या दरात वाढ होणार नसल्याचे जाहीर केले आहे .याचा फटका पुन्हा सोयाबीन भावावर होतो की काय अशी भिती शेतकऱ्यांना वाटत आहे.

काही दिवसापूर्वी सोयाबीनचे दर चार हजार तीनशे ते चार हजार पाचशे रुपयापर्यंत होते. मागील दहा ते बारा दिवसात शासनाने सोयाबीन तेलामध्ये प्रति किलो वीस रुपयांनी वाढ केली होती यावर संतप्त प्रतिक्रिया उमटत असल्यामुळे शासनाने पुन्हा सोयाबीन तेल पूर्वीप्रमाणेच विकल्या जाईल असे जाहीर केले. शासनाने सोयाबीनच्या तेलामध्ये वाढ केल्यानंतर त्याच्या काही दिवसातच सोयाबीनच्या दरामध्ये देखील थोडीफार वाढ झाली होती .

सध्याही पूर्वीपेक्षा सोयाबीन शंभर ते दोनशे रुपये दराने जास्त खरेदी कले जातआहे. सध्या सोयाबीनचे दर चार हजार पाचशे ते चार हजार ७०० पर्यंत आहेत.



वाशिम येथे नवीन सोयाबीन खरेदीचा मुहूर्त झाला त्यावेळेस प्रतिक्विंटल पाच हजार पाचशे पंचावन्न असा भाव लागला होता. मात्र त्यानंतर आता ४ ३०० ते ४७०० पर्यंत सोयाबीनला भाव आहेत. बाजारात नवीन सोयाबीनची आवक वाढल्यास सध्याच्या भावामध्ये घसरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वाशिम जिल्ह्यात सोयाबीनचे पीक ईत्तर पिकापेक्षा जास्त घेतल्या जाते त्यामुळे वाशिम जिल्ह्यात सोयाबीन हे मुख्य पीक म्हणून ओळखले जाते. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी सोयाबीनचा पेरा करतात त्यामुळे बरेचशे शेतकरी सोयाबीनवर अवलंबून असतात मात्र सोयाबीनला लागणारा खर्च व त्याचे भाव पाहता शेतकऱ्यांना हे परवडण्या जोगे नाही बाजारात काही दिवसापूर्वी नवीन सोयाबीन येण्यास सुरुवात झाली आहे.

# गडचिरोलीत लाचखोर वनपरीक्षेत्राधिकाऱ्याच्या घरावर धाड


देशोन्नती वृत्तसंकलन

**गडचिरोली :** १ लाख ७५ हजार रूपयांची लाच स्वीकारतांना रंगेहात पकडण्यात आलेल्या लाचखोर वनपरीक्षेत्र अधिकाऱ्याच्या घरावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने टाकलेल्या धाडीत मोठ्या प्रमाणात अपसंपदा आढळून आली आहे. दिवाकर रामभाऊ कोरेवार तत्कालीन वनपरीक्षेत्र अधिकारी , फिरते पथक वडसा , सध्या नेमणुक वन परीक्षेत्र अधिकारी,

### पत्नीविरोधातही गुन्हा दाखल

पाली वनआगार वाडा, ता. वाडा जि. पालघर असे आरोपी वनपरीक्षेत्र अधिकाऱ्याचे नांव आहे. त्याच्या पत्नीविरोधातही गडचिरोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

प्राप्त माहितीनुसार वडसा वनविभागातील फिरत्या पथकात वनपरीक्षेत्र अधिकारी म्हणून कार्यरत असतांना दिवाकर कोरेवार व त्याच्या



हाताखालील महिला सहकारी यांच्या विरोधात यापुर्वी कोरची पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७, १२ अन्वये १,७५,००० रुपयांची लाच स्विकारतांना लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली यांनी रंगेहाथ पकडून गुन्हा नोंद करण्यात आला होता.

त्यावरून आरोपीविरूध्द उघड चौकशी सुरू करण्यात आली होती. त्या उघड चौकशीवरून अॅन्टी करप्शन ब्युरोचे तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक शिवाजी राठोड यांनी केलेल्या चौकशीमध्ये कोरेवार याच्याकडे परिक्षण कालावधीमध्ये ज्ञात व कायदेशिर उत्पन्नापेक्षा ६६ लाख ०८,४०४ रुपयांची अधिकची अपसंपदा मिळून आली. यामुळे त्याच्यासह त्याच्या पत्नीविरोधात गडचिरोली पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन २०१८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयाचे अनुषंगाने दिवाकर कोरेवार याच्या गडचिरोली शहरातील रामनगर येथील घराची अॅन्टी करप्शन ब्युरो गडचिरोली चमूकडून झडती घेण्यात आली.

# वयोवृध्दास मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल

## मसोड येथे आखाड्यावर झाली होती फिर्यादीला मारहाण

**कळमनुरी :** तालुक्यातील मसोड येथील आखाड्यावर एका ७० वर्षीय वयोवृध्दास केलेल्या मारहाण प्रकरणी कळमनुरी पोलिसात चौघाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मसोड येथील रामजी चिमाजी भालेराव यांना १४ सप्टेंबरला आखाड्यावर झालेल्या मारहाणीचे प्रकरण चांगलेच चर्चिल्या गेले. यावरून अनेक वाद विवाद निर्माण झाले असताना १६ सप्टेंबरला या प्रकरणात गुन्हा नोंदविण्यात आला. ज्यामध्ये रामजी भालेराव शेतातील आखाड्यावर गायीचे दूध काढत असताना त्यांचे दोन्ही हात धरुन त्यांना लाथाबुक्याने बेदम मारहाण करण्यात आली. त्यांच्या गुप्तांगाजवळ गंभीर दुखापत केल्याने त्यांच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आला. या प्रकरणात रामजी भालेराव यांनी कळमनुरी पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून पंढरी सटवाजी काळे, रामभाऊ पंढरी काळे, गणेश पंढरी काळे, आशाबाई पंढरी काळे या चौघावर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास राठोड हे करीत आहेत.



राष्ट्रीय कॉन्ट्रॅक्टर लेबर युनियनद्वारा विश्वकर्मा जयंतीनिमित्त बाईक रॅली काढण्यात आली.

# आयुर्वेदात 'मॉडर्न ॲप्रोच' आवश्यक : गडकरी

देशोन्नती वृत्तसंकलन

**नागपूर :** येणारा काळ आयुर्वेदासाठी अनुकूल आहे. पण गतीने पुढे जायचे असेल तर आयुर्वेदासाठी भविष्याचे व्हिजन तयार करावे लागेल. उपकरणे/यंत्रे तयार करणाऱ्यांसोबत आयुर्वेदाचा समन्वय साधावा लागेल. आयुर्वेदात मॉडर्न ॲप्रोच आणि डिजीटल इन्फ्रास्ट्रक्चर व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. तसे झाले तर लोकांचा आयुर्वेदाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलेल, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

कुठल्याही रुग्णाला जो आजार असेल त्याचे योग्य निदान खूप महत्त्वाचे असते. रोगाचे निदान होणार नाही तोपर्यंत औषध ठरवता येणार नाही. त्यातही औषधांची गुणवत्ता खूप महत्त्वाची आहे. प्रत्येक पॅथीमध्ये चांगले संशोधन सुरू आहे. आयुर्वेदात ज्या थेरपी विकसित झाल्या आहेत, त्याचा लोकांना फायदा होत आहे,' याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व संशोधन केंद्र आणि श्री सद्गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कवीवर्य सुरेश भट सभागृहात शुक्रवारी श्री विश्व व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेचे उद्घाटन ना. गडकरी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सद्गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्टचे अध्यक्ष आनंदनाथ महाराज, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, भारत सरकारच्या भारतीय चिकित्सा पद्धतीचे अध्यक्ष डॉ. जयंत देवपुजारी, बैद्यनाथचे संचालक सुरेश शर्मा आदी उपस्थित होते.

ना. गडकरी म्हणाले, 'आयुर्वेद आणि योगविज्ञान ही भारताची मोठी शक्ती आहे. संपूर्ण जग आपल्याकडे अपेक्षेने बघत आहे. भारतीय समृद्ध संस्कृती, इतिहास आणि वारसा हेच याचे मुख्य कारण आहे. आपण पुरातन काळात विकसित केलेल्या विज्ञानाबद्दल जगाला आकर्षण आहे. आयुर्वेदात पंचकर्मासह विविध उपचार तसेच अनेक प्रकारच्या औषधांमुळे असाध्य आजार बरे झाले आहेत. आयुर्वेदाच्या बाबतीत देशात चांगले काम करणाऱ्या संस्था आहेत. पण ज्या पद्धतीने संशोधन व्हायला पाहिजे, त्यात आणखी खूप प्रयत्नांची गरज आहे.'

### आयुर्वेद हे भारतीय संस्कृती आणि इतिहासाच्या स्वाभिमानाचे प्रतिक

आयुर्वेदात कॅन्सर, अस्थमा, पोटाच्या अनेक आजारांवर औषध आहे. त्याचा चांगला परिणाम बघायला मिळत आहे. आयुर्वेद हे भारतीय संस्कृती आणि इतिहासाच्या स्वाभिमानाचे प्रतिक आहे. योगविज्ञान आणि आयुर्वेद असो, किंवा कुठलीही उपचार पद्धती असो, त्याचा स्वीकार होण्यास वेळ लागतो. विश्वासार्हता हे सर्वांत मोठे कॅपिटल आहे. ती मिळवण्यासाठी व राखण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे, अशी अपेक्षा गडकरी यांनी व्यक्त केली.

### श्री विश्व व्याख्यानमालेचे उद्घाटन



# राज्यपाल,मुख्यमंत्र्यांना खा.बजरंग सोनवणेंनी पाठविले पत्र

## मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडण्याची केली मागणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील, अंतरवाली सराटीत (दि.१७) पासून आमरण उपोषणास बसले आहेत.त्यांची प्रकृती खालावत चाललेली आहे. त्यामुळे राज्यातील कोटी मराठ्यांचा आवाज असलेले संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडविण्यासाठी तातडीने हालचाली कराव्यात, अशा मागणीचे पत्र बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शनिवारी (दि.२१)दिले आहे. मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांची खा.बजरंग सोनवणे यांनी अंतरवाली सराटीत जावून भेट घेत, त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करुन राज्यपाल व मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून उपोषण सोडविण्याची मागणी केली.



मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील, जीवाची परवा न करता, समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी संविधानिक आणि शांततेच्या मार्गाने आंदोलन करत आलेले आहेत. समाजाला आरक्षण मिळवून दिल्याशिवाय आता माघार नाही, भले जीव गेला तरी चालेल.

पान २ वर...

### पाटील आमच्या अस्मितेचा विषय

अंतरवाली सराटीत मराठ आरक्षणाचे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील आमरण उपोषणास बसले आहेत. बीड जिल्ह्याचे खा.बजरंग सोनवणे यांनी त्यांची भेट घेऊन विचारपूस केली. यावेळी ते म्हणाले पाटील कोटी मराठी तुमच्या सोबत आहेत. समाजासाठी तुम्ही आज जीवाची परवा न करता उपोषण करत आहात. तुमचा हा लढा आमच्या मुलाबाळांच्या भवितव्यासाठी एक नवी पहाट असणार आहे. त्यामुळे तातडीने मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची दखल घ्यावी.कारण मनोज जरांगे पाटील मराठा समाजाच्या अस्मितेचा विषय आहे. अशा लोकभावना खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केल्या.

# सामंजस्य भूमिकेतून उपोषण सुटले

## तत्परता: डॉ.अंजली घाडगेंची मध्यस्थी



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

ऐक वर्षेभरा पासुन सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण लढ्याला आणखी फळ मिळाले नाही तसेच पाच दीवस झाले मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील अमरण उपोषणाला बसले आहेत त्यांची तब्येत खालावत चालली आहे तरी सुद्धा सरकारला जाग आलेली त्यांच अनुषंगाने शिवश्री मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ केज तालुक्यातील चंदनसावरगाव येथील मराठा समाजाच्या विविध मागण्यासाठी पाच दीवसापुर्वीआमरण उपोषणास बसलेले उपोषणकर्ते श्री.डिंगंबर नाना तपसे यांच्या आमरण उपोषणास्थळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या डॉ.अंजलीताई घाडगे यांनी भेट दिली.तसेच प्रशासनाच्या विनंतीनुसार आज दि.२१ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ०९:०० वाजता नायब तहसीलदार वाघ मॅडम व युसूफ वडगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या उपस्थितीत श्री.डिंगंबर नाना तपसे यांचे आमरण उपोषण सोडण्यात आले. याप्रसंगी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केजमध्ये गावागावात मटका तेजीत?

## चर्चा: हप्ते घेवून पद्धतशीरपणे कार्यक्रम सुरु



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील खेड्यापाड्यात गावागावात मटका जुगार खुलेआम चालू आहे.ऐवढ्या खुलेआम मोठ्या प्रमाणात मटका जुगार सुरू असताना प्रशासनाचे दुर्लक्ष कशामुळे आहे असा प्रश्न उपस्थित होतो आहे . कमलेश मीना साहेब यांच्या सारखे सिंघम पोलीस अधिकारी असताना केज तालुक्यातील खेड्यापाड्यात, गावागावात मटका घेणे खुले आम चालू तरी या मटक्याच्या धंद्यात कमिशन वर खेळ घेणार्या कारवाई न होता मटक्याच्या बुकींच्या राजकीय वरदहस्त असणार्या मालकांवर ठोस कारवाई करण्याची मागणी केज तालुक्यातील नागरिकांन मध्ये चर्चा सुरू झाली आहे.

पान २ वर...

# एनएसएल शुगर्सवर गुन्हे दाखल करा!

## ॲड.नारायण गोले:शेतकरी कामगार पक्षाचा रास्तारोको

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

एन एस एल शुगर्स साखर कारखान्याने गतवर्षी गाळप केलेल्या उसाच्या मळीचे व विषारी पाणी माजलगाव धरणाच्या पाटात सोडून दिल्यामुळे, मळीचे व विषारी पाणी पवारवाडी, खरातआडगाव, निपाणी टाकळी, रोशनपुरी, मोठीवाडी, छोटीवाडी, गंगामसला आदी गावच्या विहिरीत, बोअरवेल मध्ये व गुरांच्या सार्वजनिक पाण्याच्या खड्ड्यामध्ये उतरले असून त्या पाण्यामुळे मनुष्यासह पशुधनाच्या जीवितास धोका निर्माण झाला असून खरात आडगाव येथे गाई, म्हशी, शेळ्या यांच्या गर्भधारणा होत नसुन खरात आडगाव येथे अनेक कुत्रे पिसाळली आहेत व त्यांनी अनेक नागरिकांना चावा देखील घेतला आहे, याशिवाय अनेक शेतकऱ्यांची पिके या विषारी पाण्यामुळे जळून गेले असून अनेक नागरिक दवाखान्यांत हेलपाटे मारत आहेत, मनुष्यासह पशुच्या जीवितास



धोका निर्माण करणाऱ्या एन एस एल शुगर्स कारखान्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांना २०२४-२०२५ च्या ऊस गाळपाचा परवाना देऊ नये, तसेच गेल्या दहा वर्षापासून शेतकऱ्यांना शेती परवडत नसल्यामुळे शेतकऱ्याच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर झाल्यामुळे शेतकऱ्याचा संपूर्ण कर्ज माफ करण्यात यावी तसेच २०२०,२०२३,२०२४ चा पिक विमा शेतकऱ्याच्या खात्यात जमा करण्यात यावा तसेच गतवर्षीच्या सोयाबीन कापसाचे अनुदान सरसकट देण्यात यावे शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव देण्यात यावा,यासह मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागण्या तात्काळ मंजूर करण्यात याव्यात या मागण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली गंगामसला येथे २१ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता तब्बल दीड तास रास्ता रोको

पान २ वर...

# केजमध्ये भाजपविरोधी वातावरण!

## चर्चा: लुडबूड करणाऱ्या रंग-बिल्लाला आवर घाला?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यात भाजप हा फक्त दिखाव्या पुरता पक्ष आहे. यात फक्त एकाच समाजाचा भरणा आहे त्यातल्यात्यात या पक्षात दोन नेते आपलपोटे आहेत फक्त आणि फक्त आपलाच कसा स्वार्थ साधला जाईल ते फक्त ऐवढेच बघतात त्या एक तालुका पदाधिकारी असून एक सेल चा पदाधिकारी आहे. हे गर्दी जमवण्या साठी नसून फक्त गर्दीत आपला तोरा दाखवण्यात मश्गुल असतात. सूत्रसंचालन एकाला काहीच येत नाही. आमदार नामीता तुमच्या कानाला लागणारे हे दोन भुंगे असतात ते दुर्सया कार्यकर्त्यार्ला नेत्याला कधीच जवळ जाऊ देत नाहीत. त्यामुळेच या दोघांवर भाजप पदाधिकारी व भाजपच्या मतदारांचा खूप रोष आहे. पण ते जेंव्हा पंकजाताई, प्रितमताई मंतदारसंघात येतात तेंव्हा हे त्यांच्या पासून हलतच नाहीत त्यामुळे यांची



तक्रारही करता येत नाही. अशीच परिस्थिती जर लोकसभेत राहिली तर अनेक नेते हे पंकजाताई च्या प्रचारात आलीप्त रहातील असे व्यक्तीगत रित्या चर्चा करताना दिसतात. पंकजाताई मुंडे यांना केज मतदार संघात याचा परिणाम जाणवल्या शिवाय राहणार नाही. यांनी कधी भाजप चे मेळावे घेतले नाहीत, शाखा उघडल्या नाहीत. फक्त पद

पान २ वर...

# काँग्रेससाठी तीन जागा सोडून घेणार

## कुणाल चौधरी:बीडमध्ये काँग्रेसचा मेळावा



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील काँग्रेसच्या प्रत्येक कार्यकर्त्यात मोठा उत्साह आहे. हा कार्यकर्ता घराघरात जाऊन काँग्रेसची विचारधारा सांगत आहे. बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा पैकी जिल्हाध्यक्ष राजसाहेब देशमुख यांच्या मागणीनुसार महाविकास आघाडीच्या कोट्यातून बीड जिल्ह्यातील तीन विधानसभेच्या जागा काँग्रेसला मिळाव्यात यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करेल आणि पक्षश्रेष्ठींकडून तीन जागा सोडून घेईल असे महाराष्ट्र राज्याचे सहप्रभारी कुणाल चौधरी म्हणाले. तर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोकराव पाटील म्हणाले की काँग्रेस बीड जिल्ह्यात मजबूत पक्ष झाला आहे. आम्हाला लढायला संधी दिल्यास आमचे अस्तित्व कळेल. जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख म्हणाले आदरणीय राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेमुळे ग्रामीण भागात शहरातील सर्वसामान्य माणूस काँग्रेसच्या विचारधारेसोबत जोडला गेला आहे. बीडमध्ये आमची मोठी ताकद निर्माण झाली असून ही ताकद दाखवण्यासाठी लढणे गरजेचे आहे. त्यासाठी आम्हाला बीड जिल्ह्यातील सहापैकी ३ विधानसभा काँग्रेससाठी सोडाव्यात त्या निवडून आणण्याची ताकद इथल्या काँग्रेसमधल्या प्रत्येक कार्यकर्त्यांमध्ये असल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्र राज्याचे सहप्रभारी कुणाल चौधरी यांच्या उपस्थितीमध्ये बीडमध्ये शुक्रवारी काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा मेळावा संपन्न यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख म्हणाले की देशाचे विरोधी पक्ष नेते आदरणीय राहुलजी गांधी यांनी भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून काँग्रेसला नवचैतन्य

पान २ वर...

# योजनांची पुस्तिका दिली भेट



पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

केंद्रीय कामगार,रोजगार आणि युवा खात्याचे मंत्री डॉ.मनसुख मांडवीय यांना शिवसेना प्रणीत शिव कामगार सेनेचे अध्यक्ष सुधीर कुरुमकर यांनी केन्द्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची पुस्तिका भेट दिली. भारतीय जनता पक्षाच्या डिपी रोड येथील मुख्यालयात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी शिव कामगार सेनेचे अध्यक्ष सुधीर कुरुमकर,शिव कामगार सेना महाराष्ट्र राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र सोनार, खजिनदार सुनील ढोकले,वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख अजय सपकाळ,व राजेंद्र बडदे,आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ.मनसुख मांडवीय यांनी उपक्रमाचे कौतुक केले व याद्वारे अधिकाधिक नागरिकांपर्यंत ही पुस्तिका पोचवावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

# कॉम्रेड सीताराम येचुरींना आदरांजली

## आवाहन: बीडमध्ये सर्वपक्षीय शोक सभेचे आयोजन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (माकप) महासचिव कॉम्रेड सीताराम येचुरी यांचे दिनांक १२ सप्टेंबरला आजारामुळे निधन झाले. त्यांना आदरांजली वाहण्यासाठी बीडमध्ये रविवारी दिनांक २२ सप्टेंबर रोजी, संध्याकाळी ६ वाजता, तुलसी इंग्लिश स्कुलच्या सभागृहात सर्वपक्षीय शोक सभेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी सर्वपक्षीय नेते व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माकपने केले आहे.

कॉम्रेड सीताराम येचुरी यांना श्वसनाच्या त्रासामुळे मागील महिन्यात दिनांक १९ ऑगस्टला दिल्लीच्या एम्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. परंतु बरेच दिवस उपचार घेऊनही त्यांची प्रकृती सुधारली नाही. अखेर दिनांक १२ सप्टेंबरला त्यांचे निधन



झाले. त्यांनी मृत्यूआधीच त्यांचे शरीर एम्सला संशोधन कामासाठी दान दिले होते. कॉम्रेड सीताराम येचुरी हे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव होते. २००५ ते २०१७ दरम्यान ते राज्यसभेचे खासदार होते. तसेच ते स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय)चे राष्ट्रीय अध्यक्ष राहिलेले आहेत. देशातील श्रमिक जनतेच्या संघर्षात

पान २ वर...

## राजू जोगदंड | मंत्री रामदास आठवलेंच्या सत्कारास उपस्थित रहावे

# बीडचा सत्कार सोहळा ऐतिहासिक होणार

बीड/ पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भारत सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी सायंकाळी ठीक ५ वाजता बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान हा सत्कार सोहळा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या नेतृत्वात पार पडणार आहे.







भव्य सत्कार सोहळ्यास राजा सरवदे (रिपाइं प्रदेश अध्यक्ष), अविनाश महातेकर (राष्ट्रीय सरचिटणीस रिपाइं), बाबुराव कदम (राज्य कार्याध्यक्ष रिपाइं), गौतम सोनवणे (राज्य सरचिटणीस रिपाइं), दौलत खरात (रिपाइं नेते),अड. ब्रह्मानंद चव्हाण (रिपाइं नेते), मिलिंद शेळके (मराठवाडा अध्यक्ष रिपाइं), परशुराम वाडेकर (रिपाइं नेते), चंद्रकांत चिकटे (रिपाइं नेते), श्रीकांत भालेराव (रिपाइं नेते), सिद्धार्थ कासारे (मुंबई प्रदेश अध्यक्ष रिपाइं), डॉ. विजय मोरे (राज्य सरचिटणीस रिपाइं युवक आघाडी), डॉ. सिद्धार्थ भालेराव (रिपाइं नेते), सचिन मोहिते (मुंबई प्रदेशाध्यक्ष युवक आघाडी रिपाइं), भास्कर रोडे (राज्य सदस्य रिपाइं), विजय सोनवणे (रिपाइं नेते) आदी प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

मंत्री रामदास आठवले यांचा बीड शहरातील सत्कार सोहळा ऐतिहासिक करण्यासाठी जिल्हाभरातील रिपाइं पदाधिकारी, युवक आघाडी रिपाइं पदाधिकारी, महिला आघाडीच्या पदाधिकारी, गायरान धारक, विद्यार्थी आघाडी, क्रियाशील सदस्य, सर्कल प्रमुख व कार्यकर्ते यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहून भव्य सत्कार सोहळा ऐतिहासिक करावा.असे आवाहन रिपाइंचे बीड जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी केले आहे.

# 'वंचित'च्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर

## निवडणूक : जाहीरनामाही लवकरच प्रसिद्ध करणार











अप्पासाहेब मकासरे/ नगर

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी आज मुंबई येथील पत्रकार परिषदेत वंचित बहुजन आघाडीची विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पहिल्या यादीत ११ जणांची घोषणा करण्यात आली आहे.

रावेर मतदासंघातून शमिभा पाटील (तृतीय पंथी/ लेवा पाटील), सिंदखेड राजा मतदार संघातून सविता मुंढे (वंजारी), वाशिम मतदासंघातून मेघा किरण डोंगरे (बौद्ध), धामणगाव रेल्वे मतदासंघातून नीलेश विश्वकर्मा (लोहार), नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघातून विनय भांगे (बौद्ध), साकोली मतदासंघातून डॉ. अविनाश नन्हे (धीवर), नांदेड दक्षिण मतदासंघातून फारूक अहमद (मुस्लीम), लोहा मतदारसंघातून शिवा नारांगले (लिंगायत), औरंगाबाद पूर्व मतदासंघातून विकास दांडगे (मराठा), शेवगाव मतदासंघातून किसन चव्हाण (पारधी), खानापूर संग्राम माने ( वडार) यांना पहिल्या यादीत स्थान मिळाले आहे.

आमच्या पवित्र विचारधारेशी खंबीर राहून, खरे प्रतिनिधित्व आणि राजकीय सत्ता मिळवण्याचा आणि काही

पान २ वर...